# आधुनिक केसरी

मंगळवार, 27 सप्टेंबर 2022

किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - 02 अंक - 55

Title Code : MAHMAR51117

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 27 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-55 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5


## आई तुळजाभवानीची मूळ सिंहासनावर प्रतिष्ठापना



### || महालक्ष्मी ||

राहो आम्हावरी | कृपा अंबाबाई ||
सकळांची आई | महालक्ष्मी ||१||
करवीर क्षेत्री | जरी तुझा वास ||
आमुचा तो श्वास | महालक्ष्मी ||२||
संसार हा सारा | क्लेशाने ग्रसला ||
आनंद जीवाला | महालक्ष्मी ||३||
कृपावंत माय | संकटा निवारी ||
चिंतामुक्त करी | महालक्ष्मी ||४||
जगण्याचे बळ | देते अंबाबाई ||
दुरितांची आई | महालक्ष्मी ||५ ||
ध्यास मज लागो | तुझ्याच नामाचा ||
दास मी युगाचा | महालक्ष्मी ||६ ||
सर्वेश्वरी तू | योगेश्वरी तू ||
ज्ञानेश्वरी तू | महालक्ष्मी ||७||
कुलदेवता तू | तू कुलस्वामिनी ||
मस्तक चरणी | महालक्ष्मी ||८||

प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क : ९४०३०२९१७८

# ज्योतिराव फुले विज्ञानाचे पुरस्कर्ते

## समाज उभारणीसाठी त्यांचे विचार उपयुक्त : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महात्मा फुले हे विज्ञानाचे, आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांचे हे काम पुढे नेण्याचे अतिशय चिकाटीचे आहे, गरजेचे आहे. कारण महात्मा फुले यांचा विचार हा परिवर्तनाचा, विज्ञानाचा पुरस्कार करणारा, समाजातील शेवटच्या माणसाचे हित जोपासणारा व त्यांच्या दु:खांची मांडणी करणारा आहे, तो वाढविला पाहिजे, अधिक वृद्धिंगत करायला हवा. महात्मा फुले यांचे हे विचार आजच्या काळातही समाजाच्या उभारणीसाठी अत्यंत उपयुक्त असून हे विचार देशातील शेवटच्या तरुणाच्या मनात रुजविण्याची आवश्यकता असल्याचे मत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले.**

महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला १५० वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे राज्यातील सत्यशोधक चळवळीत काम करणाऱ्या मान्यवरांचा मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुधे, महिला प्रदेशाध्यक्षा मंजिरी धाडगे, सदानंद मंडलिक, प्रदेश उपाध्यक्ष दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, प्रदेश चिटणीस समाधान जेजुरकर, शहराध्यक्ष कविता कर्डक, जिल्हाध्यक्ष प्रा.ज्ञानेश्वर दराडे, डॉ. योगेश गोसावी, महिला जिल्हाध्यक्षा पूजा आहेर, शहराध्यक्ष आशा भंदूरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



संबंध समाजामध्ये अवैज्ञानिक परंपरा, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य पद्धती, ब्राह्मण्य, अमानवी व माणुसकीला काळिमा फासणारे प्रकार देशात सुरु होते. यावेळी भगवान गौतम बुद्धांनी याला विरोध करून सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी याच सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यातून त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीभेद आणि अन्याय याची परिसीमा त्याकाळी गाठली गेली होती अशावेळी धार्मिक आणि सामाजिक सुधारणा असा दुहेरी भाव सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून मांडला गेला असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

महात्मा फुले यांनी गुलामगिरी, अस्पृश्यता, स्त्री दास्य, जनावरांच्या हत्या याला विरोध केला. व्यसनापासून दूर रहावे अशी शिकवण त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून दिली. सत्यशोधक समाजाचा केवळ आणि सामाजिक सुधारणा हा हेतू नव्हता तर लोकप्रबोधन, शिक्षण सुधारणा, शेतकरी हित, सावकारी उच्चाटन यासह अनेक प्रश्नांवर काम केले असल्याचे सांगत महात्मा फुले यांनी मांडलेला शेती विज्ञानवादी विचार हा अतिशय महत्वाचा असल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

महात्मा फुले यांचे हे विचार पुढे छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासह अनेक समाजसुधारकांनी रुजवले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून त्याचा जीर्णोद्धार केला. तसेच त्यांच्यावर पोवाडा तयार करून सत्य जगासमोर मांडले असेही शरद पवार यांनी यावेळी सांगितले.

# पोलिसांची २० हजार पदे भरणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात शिंदे-फडणवीस सरकारने तरुणांच्या दृष्टीने एक मोठा निर्णय घेतला आहे. मागील दोन वर्षापासून कोविड व अन्य कारणांमुळे रखडलेली पोलीस भरती आता राज्य सरकारकडून केली जाणार आहे.

राज्यात आता तब्बल २० हजार पोलिसांची पदे भरली जाणार असल्याची माहिती आज(सोमवार) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः प्रसार माध्यमांना दिली. एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मी घेतलेला आहे. तो म्हणजे दोन वर्षांची पोलीस भरती आता आम्ही हाती घेत आहोत. साधारणपणे पोलिसांची २० हजार पदे भरण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे. असे फडणवीस यांनी जाहीर केले आहे. याचबरोबर या संदर्भातील कार्यवाही आम्ही लवकरात लवकर करू. जवळपास साडेसात ते आठ हजार पदांची एक जाहिरात निघालेली आहे. अजून १२ हजार पदांची एक जाहिरात ही लवकरच आम्ही काढणार आहोत. त्यामुळे मोठ्याप्रमाणावर पोलीस भरती आम्ही करणार आहोत. मला असे वाटते यामुळे पोलीस दलाला निश्चतपणे फायदा होईल. अशीही माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय पोलीस भरतीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या राज्यभरातील लाखो तरूणांसाठी निश्चितच दिलासादायक ठरणार आहे. तर या अगोदर राज्यातील गृह विभागात लवकरच सात हजार पोलिसांची भरती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ ऑगस्ट रोजी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली होती.

राज्यातील विविध शहरांमध्ये पोलीस विभागात मनुष्य बळ कमी पडत आहे. मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन लवकरच सात हजार पोलिसांची भरती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आणखी सात हजार पोलिसांची भरती केली जाणार आहे. त्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. असे फडणवीसांनी त्यावेळी सांगितले होते.


www.csmsspoly.com

CSMSS

SINCE 2009

CHHATRAPATI SHAHU MAHARAJ SHIKSHAN SANSTHA

COLLEGE OF POLYTECHNIC

SINCE 1986

DTE CODE 2176

APPROVED BY AICTE, NEW DELHI, DTE, GOVT. OF MAHARASHTRA & AFFILIATED TO MSBTE, MUMBAI

KANCHANWADI, PAITHAN ROAD, AURANGABAD. PH-0240-2646402, 405, HELPLINE 7447746565, 7447756565, 9767305899

SPOT ROUND

FOR DIRECT SECOND YEAR (DSY) FOR THE SEATS AGAINST CAP.

TUESDAY, DT. 27/09/2022 AT 10.30 AM

BRANCH

CIVIL ENGG.

ELECTRICAL ENGG.

MECHANICAL ENGG.

EXCELLENT GRADE BY 'MSBTE' MUMBAI TO ALL BRANCHES.

CAMPUS PLACEMENTS


JOHN DEERE | SIEMENS | JCB | BOSCH | TATA MOTORS | ENDURANCE | Infosys | BAJAJ | BG LI-IN Electricals Ltd | HEROelectric | Epiroc

HON. RANJEET MULAY, PRESIDENT | HON. PADMAKAR MULAY, SECRETARY | DR. SHRIKANT DESHMUKH, ADMINISTRATIVE OFFICER | DR. GANESH DONGRE, PRINCIPAL


# प्राथमिक शिक्षक बँकेच्या वार्षिक सभेत गदारोळ

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** नफा वाटणीच्या मुद्द्यावरून प्राथमिक शिक्षक बँकेच्या वार्षिक सभेमध्ये सोमवारी गदारोळ माजला. हक्काचा लाभांशातील १ कोटी ७० लाख रूपये इमारत फंडासाठी वर्ग करण्याला विरोधकांचा विरोध होता. फलक दर्शवत विरोध होत असतानाही विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करण्यात आल्याची घोषणा अध्यक्ष विनायक शिंदे यांनी केली. दरवर्षी गदारोळामुळे शिक्षक बँकेची वार्षिक सभा गाजत असते. दोन महिन्यांपूर्वी सत्तांतर होउन बारा शिक्षक संघटनांच्या पाठिंब्यामुळे बँकेत स्वाभिमानी पॅनेल सत्तारूढ झाल्यानंतरची हि पहिलीच सभा होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपाध्यक्ष अनिता काटे यांच्या हस्ते करण्यात आले. सभा वादळी होण्याच्या शक्यतेमुळे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सभेला सुरूवात होण्यापूर्वीच सत्ताधारी गटाचे शिक्षक सभासद सभागृहामध्ये पुढील बाजूस स्थानापन्न झाले होते. यामुळे विरोधकांना मागील बाजूस उभा राहण्याचाच पर्याय शिल्लक होता. सभेपूर्वीच घोषणा-प्रतिघोषणांनी सभागृह दणादूण गेले. सभा सुरू होताच मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोले यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले. अध्यक्ष शिंदे यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन करताच सभागृहातील सभासदांकडून मंजूर-नामंजूरच्या घोषणा देण्यात येत होत्या. अध्यक्षांनी सभासदांनी उपस्थित केलेल्या काही सूचनांचाही चर्चा यावेळी केली. दरम्यान, सत्ताधारी गटाने दबावाने सर्व विषय मंजूर केल्याचा आरोप माजी अध्यक्ष उत्तमराव जाधव यांनी केला. अध्यक्ष शिंदे यांनी सभा खेळीमेळीत व शांततेत पार पडली व सर्व विषय मंजूर झाल्याचा दावा केला.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## महिलांचा आंदोलनातील सहभाग

त्या मुलाला सांभाळणे, सासू सासऱ्यांची सेवा करणे याशिवाय उपजीविकेसाठी शेतावर काबाडकष्ट करणे असा समस्यांना तिला तोंड द्यावे लागले. १९७० मध्ये अलकनंदा नदीला पूर येऊन उत्तराखंडमध्ये प्रचंड नुकसान झाले. यावेळी चंडिप्रसाद भट, गोविंद सिंह रावत आदी मंडळींनी गावोगाव फिरून लोकांना पुराची कारणे सांगून पर्यावरण रक्षणासाठी चळवळीचे आवाहन केले. रेणी गावातही त्यांच्या सभा झाल्या. १९७४ मध्ये रेणी गावातील अडीच हजार देवदार वृक्षांची तोड करायचे नियोजन व्यापारी आणि ठेकेदारांनी केले होते. त्यासाठी जी झाडे तोडली जाणार होती, त्या झाडांवर खुणा ( मार्किंग ) करण्यात आल्या होत्या. यावेळी गौरा देवी तेथील महिला मंडळाची अध्यक्ष बनली होती. तिने गावात अनेक सभा घेऊन महिलांना जागृत केले.
गावातील पुरुष मंडळी देखील या चळवळीत सक्रिय होतीच पण याच सुमारास त्यांना त्यांच्या शेतीची भरपाई देण्यासाठी चमोलीला बोलावून घेण्यात आले.



एक लढा असाही
( भाग-4)

गावात आता केवळ स्त्रिया उपस्थित होत्या. याच परिस्थितीचा फायदा घेऊन ठेकेदारांनी झाडे तोडण्यासाठी मजुरांना आणले. गौरा देवीला हे कळताच गावातील स्त्रियांना तिने एकत्र केले. सगळ्यांनी मिळून जी झाडे तोडली जाणार होती, त्या झाडांना मिठी मारली. झाडे तोडण्याआधी आधी करवत आमच्या अंगावर चालवा, मगच झाडे तोडा असे आवाहन त्यांनी केले. झाडे वाचली. गौरा देवीने या आंदोलनाचे नेतृत्व केले त्यामुळे तिला चिपको आंदोलनाची जननी समजले जाते. तिच्या कार्याचा गौरव १९८६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते तिला प्रथम वृक्ष मित्र पुरस्कार प्रदान केला गेला. गौरा देवी एका मुलाखतीत म्हणाल्या होत्या, ' हे जंगल आमची माता आहे. आमचं माहेर आहे. तेच आम्हाला फळे, फुले आणि उपजीविकेची साधने पुरवते. जर जंगल तोडाला तर पुरासारख्या आपत्ती येणारच. ' आज गौरा देवी हयात नाहीत पण तेथील गावागावात प्रत्येक महिलेच्या मनात आपल्या विचाराने गौरा देवी जिवंत आहे. या चळवळीत योगदान देणाऱ्या आणखी काही स्त्रियांबद्दल पुढील भागात माहिती घेऊ या. ( क्रमशः )




## आनंदी पहाट

## अर्थार्जनाचा राजमार्ग निवडावा

आधुनिक केसरी

आपल्या दैनंदिन जीवनांत अनेकदा विविध कारणास्तव निरनिराळे अर्ज, माहितीपत्र, बँकांचे के वाय सी, कर्जाच्या संदर्भातील, घर खरेदीच्या वेळी बिल्डर्स बरोबर करावे लागणारे करारनामे, अनेक कायदेशीर प्रक्रियेत पूर्तता करण्यासंबंधीची कागदपत्रे अशा अनेकविध कागदपत्रांवर आपण स्वाक्षरी करण्याअगोदर त्यांचे पूर्ण वाचन, सखोल अभ्यास करत नाहीत. बँकांचे, इन्शुरन्स कंपन्यांचे सर्वच कागद, अगदी काहीवेळा तर काहीही न लिहिलेले कोरे कागद देखील करारनाम्याच्या नावाखाली डोळेझाक करून, अतिविश्वास ठेवून अथवा गरजेपोटी स्वाक्षरी करून आणि त्याची कोणतीही स्थळप्रत, कॉपी आपल्याजवळ संदर्भासाठी न ठेवता आपण संबंधिताकडे जमा करत असतो. आपल्या अभ्यासाच्या अभावामुळे आणि आभासी दुनियेच्या आकर्षणामुळे भविष्यात आपल्यावरच पश्चात्तापाची वेळ येऊ शकते. काहीवेळा करिअर निवडीचा घेतलेला निर्णय तापदायक ठरल्याचे अनुभवायला येते. आपण करिअर निवडायचे ठरवले खरे परंतू, काहीतरी भलतेच झाले. करिअर निवडण्याच्या वेळेला मार्गदर्शन करणारे खूप जण भेटतात परंतू, योग्य करिअर निवडल्यावर यशप्राप्तीच्या मार्गाचे दर्शन घडवणारी व्यक्ती भेटतेच असे नाही. एकूणच आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते ती योग्य करिअर निवडून अर्थार्जन करण्याची, पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची. प्रत्येकाच्या जशा गरजा वेगवेगळ्या असतात तसेच उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरे कसब आपल्या करिअर निवडण्यात असते. जो योग्य करिअरची निवड करतो तोच अर्थार्जन उत्तम प्रकारे करू शकतो. आपण निवडलेल्या करिअरचा केवळ गरजेपुरता आणि अर्थार्जनासाठी उपयोग करून चालणार नाही, तर करिअरमधील स्थिरता आणि आत्मिक आंनद मिळवण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. यासाठी आपण प्रत्येक बाबतीत चिकित्सा केली पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### गिरवीतो रोज | बाराखडी ||

संथ गाणे माझे | अभंग ते व्हावे ||
संत रूप गावे | शब्दांतूनी ||१||

संतवचनांचा | घडो नित्य संग ||
होऊ नये भंग | समाधीचा ||२||

विचार मोहाचा | गळूनी पडावा ||
सत्संग घडावा | रात्रंदिन ||३||

अहंकारा अंगी | क्लेशाचे कुंपण ||
हरिचे चिंतन | कैसे घडे ? ||४||

ज्ञाना-तुका संगे | अभंगाचे गुज ||
गिरवावी रोज | बाराखडी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं कल्याणकर्त्रि ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मन्मानसे स्थिते नमः।। २२ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. कल्याण करणारे तुला नमस्कार असो. माझ्या मनामध्ये स्थित, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं कृपाकर्त्रि नमो नमः।**
**नमस्तुभ्यं जगन्मातः परशुराममातृके।। २३ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. कृपा करणारे तुला नमस्कार असो. हे जगज्जननी, परशुरामाचे आई, तुला नमस्कार असो.

## ॐ सेवाफलविवर्धिन्यै नमः



आधुनिक केसरी

मठी, घटी, आकाशी अशा त्रिभुवनात व्याप्त असं चैतन्य घेऊन अतिशय ऊन्मेशाने, बलोद्वताने आपल्या सर्वाच्या मांगल्यासाठी सतत झटणाऱ्या जगन्मात्रेचे आगमन नवरात्राच्या रूपात होत आहे. शारदीय नवरात्र म्हणजेच विद्येच्या रूपात सरस्वती म्हणून येत आहे. समस्त प्राणीमात्रात स्त्रुजनात्मका दिवसेंदिवस वाढत राहो. नवदिवसांचे हे अंकुरलेले बीजरूप चैतन्य सर्व मानव जातीस सद्विचार, सदाचाराचा सदानंदाचा जाणीव नेणीवाची आठवण देत राहो. घटरूपी शेतात धनधान्य भरपूर येऊ दे. सर्व प्राणीमात्रांना अन्नपूर्णेच्या रूपात माता प्रसन्न होवो. जगन्मात्रेचे हे रूप आदिशक्तिच्या रूपात आहे. सर्व प्राणीमात्रांचे चित्त शुध्द करो,मनामध्ये सतत निर्मळपणा राहो. जीभेवर सतत सद्विचारांची माया असु दे. कानावर सतत चांगले ऐकायला येऊ दे. सर्व जण सुखसंपन्न, सुमुख्यै होऊ दे असा मांगल्याचा सदाचाराचा जोगवा मी तुला मागते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**तू माझी माऊली जाण मी बालक तव तान्हा।**
**क्षमस्व माते अपराधांची करू नको गणना।**
**नरदेहाचे सार्थक होते तव पूजन करूनी।**
**अखंड शाश्वत प्रेमसुखाचा दे मजला ठेवा।**
**जोगवा मागते आई  तुजला जोगवा मागते।**




## जागर देवी दर्शनाचा



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**नमस्कार-घरोघरी नवरात्र सुरु झाले आहे.आई जगदम्बा आपल्या सर्वांचा सांभाळ करो, तिची सदा कृपा असो. ही प्रार्थना करून ..शुभेच्छा देतो. देवीची कृपा, मातेची इच्छा काही म्हणा मला माझी "अक्षर -सेवा " अर्पण करावी अशी इच्छा झाली आणि  मी केलेल्या "देवी दर्शन यात्रेच्या आठवणीचा जागर" करणार आहे. माझ्या आठवणी वाचून तुम्हालाही  तुम्ही केलेल्या दर्शन यात्रा नक्कीच आठवतील.**

# श्री योगेश्वरी, अंबाजोगाई

आपल्या सामूहिक -सार्वजनिक जीवनात आनंद आणि उत्साहाचे वातवरण ठेवण्यात "उत्सवांचा फार मोठा वाटा आहे. "नवरात्र महोत्सव"असाच एक सर्वप्रिय उत्सव आहे. कल आज और कल" असा हा त्रिकालाबाधित महोत्सव आहे. लहानपणापासून आपल्यातला प्रत्येकजण आई-जगदंबेच्या दर्शनासाठी अगदी आठवणीने जातो. मंगळवारी-शुक्रवारी" देवी-दर्शनासाठी जाणारे "देवींचे भक्त" आपण पहात असतो.
उपासना- आराधना करणाऱ्या आपल्या भक्तांवर देवी नेहमीच प्रसन्न होत असते", असे मानणारे  "देवी-भक्त" ,आहेतच की.
१९६८- १९७१- या पन्नास वर्षापूर्वीच्या दिवसात मी अंबाजोगाई येथे योगेश्वरी महाविद्यालयाचा बी. कॉमचा विद्यार्थी म्हणून होस्टेलवर रहात होतो.
आद्यकवी मुकूंद राज, आणि "पासोडीकार-दासोपंत",
हे थोर कवी व्यक्तिमत्व अंबाजोगाईची ओळख "ही गोष्ट  त्यावेळेपासून मनावर ठसलेली आहे.  अंबाजोगाईच्या हवेतच सांस्कृतिक आणि वैचारिकपणा भरभरून आहे, माझ्या कॉलेज जीवनातील हा गंध-सुगन्ध आजही माझ्या "वानप्रस्थाश्रम -पर्वात दरवळत आहे. असाच सुगन्ध दरवळत असतो ..श्रीयोगेश्वरी देवी मंदिर,आणि देवी दर्शनाच्या ओढीने "हॉस्टेल ते मंदिर" केलेली पायपीट.. ते अनेक-अनेक मंगळवार आणि शुक्रवार". कॉलेज ते मंदिर हे अंतर सुद्धा लांबचे वाटे, पण, मोठ्या कमानीतून पुढे जात मंदिरात प्रवेश केला की, काय जादू व्हायची कळत नसे,  होमकुंडाला वळसा घालून , पायरीला नमस्कार करून गाभाऱ्यात जाई पर्यंत .. "योगेश्वरीआईचे रूप डोळ्यात साठवतांना, बाकीचे काही दिसायचे नाही. आत गेल्यावर नतमस्तक होऊन दर्शन घेतलं की " जाई मन पालटून माझे", अशी सहज-अवस्था " होऊन जायची.ही अनुभूती घेणाऱ्या असंख्य भक्तांपैकी एक भाग्यवंत मी देखील आहे.
म्हणूनच की काय ..आई योगेश्वरीच्या दर्शनाचा योग पुन्हा 1973-1975 या दोन वर्षात आला, यावेळी मी स्टेट बँक ऑफ हैदराबाद च्या अंबाजोगाई शाखेत टायपिस्ट-क्लर्क म्हणून काम केले. याही काळात मंगळवारी-शुक्रवारी आई-योगेश्वरीचे दर्शन घडले. या काळातले अंबाजोगाई म्हणजे "विद्यार्थ्यांनी गजबलेले सुंदर ,टुमदार गाव, जे कॉलेजच्या सुट्टीच्या दिवसात रिकामे रिकामे "वाटे. जुने बस स्टॅण्ड, बाजूच्या हॉटेली, सागर आणि मोहन टॉकीजचे सिनेमे" हीच करमणूक आणि विरंगुळा होता. पुढे 90 च्या दशकात माझ्या मुलाने त्याचे इंजिनियरिंग अंबाजोगाईला केले,योगेश्वरी आईचीच कृपा " आहे आमच्यावर.

अंबाजोगाई नगरीला जावे
जोगाई -योगेश्वरीच्या दर्शना
करावे कल्याण माते आमुचे
आपण करू या हीच प्रार्थना ।।
आद्यकवी मुकुंदराज इथले
दासोपंत "पासोडीकार "इथले
विद्यानगरी शोभते स्थान हे
माता योगेश्वरी आहे हो इथे ।।

# वेदांता फॉक्सकॉन प्रकरणी खोटारडेपणाबद्दल मविआ नेत्यांनी माफी मागावी

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वेदांता फॉक्सकॉनचा प्रकल्प पुण्याजवळ तळेगाव येथे उभारण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोणताही करार झालेला नव्हता आणि कंपनीला त्या प्रकल्पासाठी कोणताही भूखंड दिलेला नव्हता असे स्पष्ट करणारा कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाला असून याविषयात खोटे बोलून राज्यातील जनतेची दिशाभूल केल्याबद्दल महाविकास आघाडीच्या नेत्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना केली. शिवसेना नेते व माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी शनिवारी तळेगाव येथे वेदांता फॉक्सकॉन विषयावरून केलेले आंदोलन हा खोटारडेपणा होता. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अशी खोटारडी आंदोलने बंद करावीत. अन्यथा ते जेथे आंदोलन करतील तेथे जाऊन आम्ही त्यांना जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा मा. बावनकुळे यांनी दिला. मा. बावनकुळे म्हणाले की, वेदांता फॉक्सकॉन कंपनीबाबत एमआयडीसीचे पत्र आपल्याकडे आहे. त्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, त्या कंपनीसोबत राज्य सरकारचा



सामंजस्य करार झालेला नाही आणि कंपनीस महामंडळाकडून जागेचे वाटप झालेले नाही. अशा स्थितीत हा प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेला ही महाविकास आघाडीच्या नेत्यांची तक्रार खोटारडेपणाची आहे. प्रत्यक्षात आघाडी सरकारने कंपनीशी करार केला नाही आणि जमीनही दिलेली नाही, हे आता उघड झालेले आहे. हा प्रकल्प महाविकास आघाडीमुळेच राज्याबाहेर गेल्याचा हा पुरावा आहे. खोटारडेपणाबद्दल आघाडीच्या नेत्यांनी माफी मागावी.त्यांनी सांगितले की, वेदांताच्या विषयावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांचे आंदोलन म्हणजे इव्हेंट मॅनेजमेंट करून राज्यातील जनतेची दिशाभूल आहे. या नेत्यांनी जनतेची माफी मागण्यासोबतच ही आंदोलने बंद करावीत अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून जशास तसे उत्तर देऊ. ते म्हणाले की, अतिवृष्टीचे संकट आले असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्याला भेट देऊन पाहणी केली. ताबडतोब पंचनामे झाले. आता पूर्व विदर्भाला ११९१ कोटी रुपयांची मदत देण्याचा शासनाचा आदेश आला आहे. आपली अधिकाऱ्यांशी चर्चा झाली असून लवकरच शेतकऱ्यांना पैसे मिळतील. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना आतापर्यंत इतकी मोठी मदत कधीही मिळाली नाही. तसेच शिंदे फडणवीस सरकारने बुलेट ट्रेनच्या तत्परतेने काम केले आहे. आपण भारतीय जनता पार्टी व शेतकऱ्यांच्या वतीने या सरकारचे आभार मानतो.

# पीएफआयवरील कारवाईवर विरोधकांचे मौन का : उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या कट्टरवादी संघटनेवर केंद्रीय तपास यंत्रणांनी केलेल्या कारवाईमुळे देशात धार्मिक विद्वेष आणि दहशतवाद माजविण्याचा कट उघड झाला असून देशाच्या लोकशाही व सामाजिक सलोख्याशी तडजोड नाही हेच या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. विरोधकांनी क्षुद्र राजकारण बाजूला ठेवून देशाच्या सुरक्षेबाबत सर्व राजकीय पक्षांचे ऐक्य असल्याचे दाखवून द्यावे, असे आवाहन प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.
या कारवाईनंतर लांगूलचालनवादी पक्षांनी बाळगलेले मौन चिंताजनक आहे, असे सांगून उपाध्ये यांनी शिवसेनेकडे सूचक अंगुलीनिर्देश केला. मुस्लिम मतांवर डोळा ठेवून त्यांचे लांगूलचालन करण्याची शिवसेना पक्षप्रमुखांची नीती गटनेत्यांच्या मेळाव्यातच स्पष्ट झाली आहे. मात्र, पीएफआयवरील कारवाई ही कोणत्याही धर्माच्या विरोधातील कारवाई नसून दहशतवादास व फुटीरतावादास खतपाणी घालणाऱ्या व्यापक कटाच्या विरोधातील कारवाई आहे. हिंदुत्वाचा मुखवटा पांघरून मुस्लिम मतांवर डोळा ठेवण्याचे दुहेरी राजकारण करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी या कारवाईवर मौन का पाळले, असा सवालही उपाध्ये यांनी केला आहे. विरोधकांच्या क्षुल्लक राजकारणामुळेच राज्यातील मुस्लिमांची दिशाभूल होत आहे, असा आरोपही त्यांनी केला. अराजकाच्या उंबरठ्यावर असलेला पाकिस्तान अस्तित्व टिकविण्यासाठी धडपडत आहे. पाकिस्तानच्या समर्थनाची घोषणाबाजी करणाऱ्यांबाबत मौन पाळण्याच्या राजकारणातून मुस्लिम समाजात संभ्रम पसरविला जात आहे, असे ते म्हणाले. संपूर्ण देश आज पीएफआयच्या विघातक कारवायांची उकल करणाऱ्या तपास यंत्रणांच्या पाठीशी असताना, क्षुल्लक राजकारणापोटी या कारवायांवरच प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या विरोधकांचा हेतू शंकास्पद आहे, असेही उपाध्ये म्हणाले. मुस्लिमांच्या अनुनयासाठी कारवाईसंबंधात मौन पाळणाऱ्या ठाकरे गटाचे राजकारण देशाच्या सुरक्षिततेस बाधक आहे, अशी टीकाही त्यांनी केली. याआधी दहशतवादी कारवायांमध्ये सहभागाचा आरोप असलेल्या नवाब मलिक यांना शाबासकी देऊन व त्यांच्या मंत्रिपदास संरक्षण देऊन ठाकरे यांनी आपल्या क्षुद्र राजकारणाचे प्रदर्शन घडविले होते, याकडेही उपाध्ये यांनी लक्ष वेधले.

# अनिल देशमुखांना सुप्रीम कोर्टाचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनी लाँड्रिंग प्रकरणी अटकेत असलेले राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना सर्वोच्च न्यायालायने काहीसा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला अनिल देशमुख यांच्या जामीन अर्जावर तातडीने सुनावणी घेत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठाने २१ मार्चपासून अनिल देशमुख यांची जामीन याचिका प्रलंबित असल्याची नोंद घेतली. जामीन अर्ज दाखल करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला आपली याचिका लवकरात लवकर निकाली काढण्यात येईल अशी कायदेशीर अपेक्षा असते. जामीन याचिका प्रलंबित ठेवणे कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकाराशी सुसंगत नाही, असे खंडपीठाने सांगितले.

# शासकीय योजनेतील कर्ज वाटप बँकांनी संवेदनशीलपणे करावे : डॉ. भागवत कराड




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शासनामार्फत मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता विविध योजना राबविल्या जात आहे. बँकांशी संबंधित असणाऱ्या योजनांचे कर्जवाटप करताना बँक अधिकाऱ्यांनी संवेदनशीलपणे काम करावे अशा सूचना केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी आज येथे दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात किसान क्रेडीट कार्ड योजना आणि प्रधानमंत्री स्वनिधी योजनांची विभागीय आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, महापालिका आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे, उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक महेश डांगे, मुख्य व्यवस्थापक मंगेश केदारे यांच्यासह दुरदृश्य संवादप्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे व नगर पालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त उपस्थित होते.
जागतिक स्तरावर भारताची आर्थिक स्थिती चांगली आहे. इंटरनॅशनल मॉनिटरींग फंडस् (IMF) ही जागतिक स्तरावरील संस्था असून या संस्थेच्या सर्वेक्षणात भारत देश हा जागतिक स्तरावर पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश ठरला आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या प्रयत्नाने देशात विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता, स्वावलंबन, डिजीटलायझेशन बरोबरच गरजू लाभार्थ्यांपर्यत विविध योजना पोहोचवायच्या आहेत. जास्तीत जास्त गरजू जनतेपर्यंत जनजागृती करुन लाभार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या सूचना संबंधितांना देत श्री.कराड म्हणाले की, प्रधानमंत्री स्वनिधी योजनेतंर्गत अर्जदारांचे अर्ज विनाकारण रद्द होता कामा नये. जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने काम करावे. जिल्हानिहाय रद्द झालेल्या अर्जांचे सर्वेक्षण करुन त्रुटींचा अभ्यास करुन जास्तीत जास्त पात्र अर्ज मंजूर करावे. स्वनिधी ते समृध्दी योजनेत औरंगाबाद, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांचा समावेश असून यात परभणी जिल्ह्याचा समावेश करण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. बँकांशी संबंधित योजनांचा मासिक आढावा घ्यावा. किसान क्रेडीट कार्ड योजनेत मासेमारी करणाऱ्या बरोबरच मत्सयविक्रेत्यांचाही समावेश करणे गरजेचे असल्याचे सांगून मत्स्यव्यवसायाच्या शिबिरांचे आयोजन करण्याच्या सूचना यावेळी डॉ.कराड यांनी दिल्या.

# मक्रणपूर सोसायटीमध्ये दोन कोटी कर्ज वाटप करणार : चेअरमन अब्दुल वहाब



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपूर सोसायटीची वार्षीक सभा खेळीमेळीत पार पडली तालुक्यातील पहीलीच सोसायटी ही सहा लाख नफ्यात असुन पश्चिम महाराष्ट्रात वेगळे निकष व आपल्या मराठवाड्यात वेगळे निकष का? यामुळे आमच्या सोसायटीचे बरेचसे सभासद प्रोसानपर मिळणारे 50 हजार रुपये अनुदान यापासून वंचित राहणार आहे म्हणून सगळ्यांचा विचार करून आम्ही कोर्टात जाण्याचा विचार करत आहे. मी जेव्हा चेअरमण झालो तेव्हा सोसायटी अठरा लाखापर्यत होती व आता सोसायटी 90 लाखा पर्यत पोहचवली व दोन कोटीपर्यत पोहचवणार, असे चेअरमन अब्दुल वाहब म्हणाले.
मक्रणपूर सोसायटीमध्ये नविन सदस्य जोडण्यात येईल व त्यांना ही जास्तीत जास्त सोसायटी कर्ज देण्यात येईल. यामध्ये सर्व सभासद व सदस्य यांचे ही खूप मेहनत आहे, असेच सहकार्य राहिले तर आपली सोसायटी जिल्ह्यामध्ये एक नंबर राहील. यावेळी चेअरमन अब्दुल वहाब व्हाईस चेअरमन यमाजी वणे, सेक्रटरी रमेश राठोड, सदस्य भैय्या मेंबर, प्रवीण गर्जे, रमेश नागरे, राजू लोंढे, विलास जाधव, पंडित उचित यांची प्रमुख उपस्थीती होती. यावेळी संतोष जाधव,नंदू उचीत, सादिक शेख, पोपट लोंढे शेख शाईनाज, शेख गणी, हरिभाऊ राणे, सचिन गोसावी, मधुकर जाधव, कचरू लोंढे इत्यादींची उपस्थिती होती.



## शशी थरूरांचे ठरले

आधुनिक केसरी



सध्या काँग्रेस पक्षात अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोतही काँग्रेस अध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरले आहेत. ते अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उतरत असल्याने त्यांना राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सोडावे लागणार आहे, यामुळे राजस्थानमध्ये संत्तासंघर्ष निर्माण झाला आहे. एकीकडे राजस्थानमध्ये राजकीय उलथापालथ सुरू असताना काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी आपण काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढणार असल्याचं जाहीर केले आहे. आपल्याला देशातील बहुतेक राज्यांचा पाठिंबा असल्याचेही थरूर यांनी म्हटले आहे. केरळातील पलक्कड येथे प्रसारमाध्यमांना संबोधित करताना शशी थरूर म्हणाले की, मी गांधी कुटुंबीयांना भेटलो आहे. मी त्यांच्याविरोधात निवडणूक लढवतोय, याबाबत त्यांना कोणतीही समस्या नाही. मी पलक्कड येथून राहुल गांधीच्या 'भारत जोडो' यात्रेत सहभागी होणार आहे. गांधी घराण्यातील तिघांनीही मला सांगितले आहे की, काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याबाबत त्यांना कोणतीही समस्या नाही. जेव्हा एखादी व्यक्ती निवडणूक लढत असते, तेव्हा त्याच्यात आत्मविश्वास असायला हवा. मग प्रतिस्पर्धी कोण आहे? याचा काहीही फरक पडत नाही. सर्वांनी बहुमताने निर्णय घ्यायला हवा. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकापेक्षा अधिक उमेदवार असावेत, या मताचा मी आहे. देशातील बहुसंख्य राज्यांतून मला पाठिंबा मिळत आहे. बऱ्याच लोकांनी मला फोन केला असून मी निवडणूक लढवावी, यासाठी आग्रह केला आहे, असेही थरूर म्हणाले. केरळमधील काँग्रेस युनिटच्या भूमिकेचा संदर्भ देत थरूर म्हणाले, केरळमध्येही मला नक्कीच पाठिंबा मिळेल. पण काहीजण असेही असू शकतात, जे मला समर्थन देत नाहीत. पण याचा फारसा फरक पडत नाही. कारण लोकशाही व्यवस्थेत मतभिन्नता असावीच लागते असेही ते म्हणाले. यावेळी राजस्थानात सुरू असलेल्या सत्तासंघर्षाबाबत विचारलं असता, थरूर यांनी थेट भाष्य करणं टाळले आहे. राजस्थानातील घडामोडींबाबत आपल्याला फारशी माहिती नसल्याचं त्यांनी म्हटले आहे. शशी थरूर यांनी अशावेळी आपली उमेदवारी जाहीर केली आहे. ज्यावेळी केरळातील काँग्रेसच्या काही नेत्यांनी राहुल गांधींना आधीच पाठिंबा दिला आहे. राहुल गांधी यांनीच पक्षाचे नेतृत्व करावे, अशी इच्छा केरळमधील अनेक काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केली आहे. यामध्ये ज्येष्ठ नेते रमेश चेन्निथला आणि के मुरलीधरन या दोन्ही माजी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केरळमधील पक्ष राहुल गांधींच्या बाजूने असेल, असे उघडपणे सांगितले आहे. अशी एकंदरीत स्थिती असताना शशी थरूर यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी आपली उमेदवारी जाहीर केली आहे.

## महिषासुर मर्दिनीचे आवाहन



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**महिषासुर जसा गर्वोन्मत्त होता, देवांचा शत्रू होता, वराभिमानी होता, मायावी होता, त्याचप्रमाणे आजही असे मायावी गर्विष्ठ वराभिमानी, शक्तीचा दुरुपयोग करणारे राक्षस समाजामध्ये विद्यमान आहेत. यांचे एकरूप संपवले तर हे दुसरे रूप घेऊन उभे राहतात. कधी हे आतंकवाद्यांच्या रूपामध्ये, कधी नक्षलवाद्यांच्या रूपामध्ये, कधी उग्रवाद्यांच्या रूपामध्ये आमच्या सैन्याशी लढाई करतात तर कधी वेगवेगळ्या दहशतवादी संघटना स्थापन करून आमच्या सुरक्षा व्यवस्थेची युद्ध पुकारतात.**


प्राचीन काळामध्ये दनु नावाचा एक राक्षस होता. त्याला रंभ आणि करम्भ नावाचे दोन पुत्र होते. ते दोघेही अतिशय पराक्रमी होते व त्यांची दानवांमध्ये मोठी प्रतिष्ठा होती. संतानहीन असल्यामुळे त्या दोघांनीही मोठी घनघोर तपश्चर्या सुरू केली. करम्भ पाण्यामध्ये बुडून तपस्या करू लागला तर रंभ एका वटवृक्षाच्या खाली बसला व तिथे बसून तपश्चर्या करू लागला. या दोघांचीही घनघोर तपश्चर्या पाहून देवराज इंद्र दुःखी झाले व त्यांनी तपश्चर्या करणाऱ्या करम्भचे पाय पाण्यात जाऊन पकडले. त्यामुळे करम्भ मृत्यू पावला. करम्भच्या मृत्यूचा समाचार रंभाला मिळाल्यावर त्यालाही वाटले की आपण आपली जीवन लीला समाप्त केली पाहिजे. परंतु त्याच वेळेला अग्नी देवाने रंभ याला म्हटले की तू आत्महत्या करू नको. तुला जो काही वर पाहिजे तो तु माग. त्यावेळेस रंभ त्याला म्हणाला की त्रिलोक विजयी असा पुत्र मला व्हावा आणि अग्नीदेव त्याला तथास्तु म्हणाले. रंभ याच्यापासून एक महिषी गर्भवती झाली. एके दिवशी त्या महिषी वर एका रेड्याने हल्ला चढविला. त्या हल्ल्यापासून महिषी चे रक्षण करण्यासाठी रंभ व त्या रेड्याचे युद्ध झाले. त्यात रंभ मारला गेला. ते पाहून ती महिषी पळू लागली व तिथे जवळच राहणाऱ्या यक्षाकडे ती गेली. यक्षानी तिचा पाठलाग करणाऱ्या त्या विशालकाय रेड्याला ठार मारले व रंभ याच्या प्रेताला अग्नी दिला. ती महिषी सुद्धा रंभ याच्या चितेवर सती जाण्यास प्रवृत्त झाली. त्यावेळेस त्या चिते मधून महिषासुर व रक्तबीज प्रगट झाले. या महिषासुराने पुढे घोर तपश्चर्या केली व ब्रह्मदेवांना प्रसन्न केले. ब्रह्मदेव प्रकट झाल्यावर महिषासुर त्यांना म्हणाला की मला अमरत्व पाहिजे आहे. परंतु त्याला ब्रह्मदेव म्हणाले की जन्माला आलेला प्रत्येक प्राणी हा कधी ना कधी मृत्यू पावणार आहे. त्यामुळे तुला अमरत्व देता येणार नाही. त्यावेळेस महिषासुर म्हणाला की देव दैत्य आणि मानव यांच्यापैकी कोणापासूनही मला मृत्यू येऊ नये. माझा मृत्यू एखाद्या स्त्रीच्या हातून असावा. ब्रह्मदेवांनी त्याला तथास्तु म्हटले. पुढे हा दैत्य अतिशय गर्विष्ठ बनला. संपूर्ण पृथ्वीवर याचेच राज्य होते. देवतांचा तो वैरी झाला. इंद्राला सुद्धा त्याने पराभूत केले. त्यावेळेस ब्रह्मदेवाच्या वराप्रमाणे महिषासुराला मारण्यासाठी कुठल्यातरी दिव्य स्त्रीची आवश्यकता होती. त्यामुळे ब्रह्मा विष्णू महेश व सर्व देवांनी मिळून आपल्या तेजापासून एक स्त्री बनविली. भगवान विष्णू नी त्या देवीला आपले सुदर्शन चक्र दिले. शंकराने तिला आपला त्रिशूल दिला. व इतर सर्व देवांनी सुद्धा तीला आपापल्या जवळचे दिव्य शस्त्र अस्त्र दिले. सिहारुढ झालेले ते देवी आता अतिशय तेजस्वी व पराक्रमी दिसू लागली. देवता तिची स्तुती करू लागले व तिला म्हणाले की महिषासुर नावाचा एक राक्षस गर्वोन्मत्त



होऊन देवतांना त्रास देत आहे. त्यांचा शत्रू बनलेला आहे. तुम्ही आम्हाला या महिषासुरापासून मुक्ती द्या. त्यावेळेला देवी त्यांना म्हणाली की तुम्ही निर्भय असा. मी लवकरात लवकर त्या अज्ञानी आणि वराभिमानी दैत्याला युद्धामध्ये मारून टाकील. ताम्र नावाचा एक दैत्य जो महिषासुराचा मंत्री होता तो देवीकडे आला व त्याने देवीला महिषासुराला शरण येण्याविषयी सांगितले. त्यावेळेस देवी त्याला म्हणाली की तुम्ही सर्व दानव व तुमचा राजा महिषासुर याला जर आपले प्राणप्रिय असतील तर तुम्ही पाताळ लोकामध्ये निघून जा. अन्यथा युद्धाला तयार व्हा. सर्वप्रथम वास्कर वाष्कर आणि दुर्मुख नावाचे दोन महापराक्रमी राक्षस देवीशी युद्ध करण्यासाठी आले. देवी आणि वाष्कर यामध्ये घनघोर युद्ध झाले. परंतु सरते शेवटी वाष्कर हा देवीच्या त्रिशुळाच्या प्रहारा ने मारला गेला. त्यानंतर दुर्मुखाने सुद्धा देवीशी घनघोर युद्ध केले. परंतु शेवटी देवीच्या तलवारीच्या प्रहाराने तोही मारला गेला. चिक्षुराख्य ताम्रक्ष,असिलोमा आणि विडा लाक्ष आदि अत्यंत पराक्रमी राक्षसांचा सुद्धा देवीने संहार केला. त्यानंतर स्वतः महिषासुर युद्धाला आला. त्याने सुद्धा घनघोर युद्ध केले. तो मायावी होता. विविध रूपे बदलून देवीशी तो लढत होता. सरते शेवटी देवीने सुदर्शन चक्र चालविले व महिषासुराचे मस्तक धडावेगळे केले. महिषासुर मारला गेला. देवांचा शत्रू समाप्त झाला. देवांनी देवीचा जयजयकार केला. तिची स्तुती केली. सर्व देवतांना व पृथ्वीवासीयांना निर्भयतेचे वरदान देत देवी अंतरज्ञान पावली.

महिषासुर जसा गर्वोन्मत्त होता, देवांचा शत्रू होता, वराभिमानी होता, मायावी होता, त्याचप्रमाणे आजही असे मायावी गर्विष्ठ वराभिमानी, शक्तीचा दुरुपयोग करणारे राक्षस समाजामध्ये विद्यमान आहेत. यांचे एकरूप संपवले तर हे दुसरे रूप घेऊन उभे राहतात. कधी हे आतंकवाद्यांच्या रूपामध्ये, कधी नक्षलवाद्यांच्या रूपामध्ये, कधी उग्रवाद्यांच्या रूपामध्ये आमच्या सैन्याशी लढाई करतात तर कधी वेगवेगळ्या दहशतवादी संघटना स्थापन करून आमच्या सुरक्षा व्यवस्थेची युद्ध पुकारतात. कधी त्यांचे नाव सिमी (स्टुडन्ट इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया) असे असते तर कधी त्यांचे नाव पापुलर फ्रंट ऑफ इंडिया असे असते. एका संघटनेवर बंदी घातली तर दुसरी संघटना तयार होते. एका राज्यातून काही लोकांना अटक केल्यावर दुसऱ्या राज्यात पुन्हा काही लोक उभे राहतात. हे सर्व राक्षसी प्रवृत्तीचे लोक आहेत. देशातील सज्जनशक्तीशी यांनी युद्ध पुकारलेले आहे. यांना इंद्राच्या सिंहासनासारखे दिल्लीच्या सिंहासनाला डळमळीत करायचे आहे. यासाठी त्यांचे देशभरामध्ये आतंकवाद, नक्षलवाद, अर्बननक्षली यांच्या रूपामध्ये थैमान चाललेले असते. देशामध्ये विविध प्रकारचे आंदोलन निर्माण करून त्यांना हिंसक बनविण्याचे कार्य सुद्धा हेच लोक करीत असतात. जसे किसान आंदोलनाला यांनी हिंसक बनविले. अग्नीवीर च्या निमित्ताने निर्माण झालेल्या आंदोलनाला सुद्धा यांनी हिंसक बनविले. म्हणजे सर्वसामान्य जनतेच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्यामागून हिंसाचार, दहशतवाद पसरविणे आणि दिल्लीच्या सरकारला डळमळीत करणे अशा पद्धतीचे काम यांचे सुरू असते. आज नवरात्रीचा प्रारंभ आहे. हे शक्तीच्या उपासनेचे पर्व आहे. सज्जनशक्ती नी जशी शक्तीची आराधना केली त्याचप्रमाणे समाजातील सज्जनशक्तीला सुद्धा शक्तीची आराधना करावी लागणार आहे. देवतांच्या तेजातून जशी दुर्गा उभी राहिली तशी सज्जनशक्तीच्या तेजातून सुद्धा एक शक्तीस्वरूपीणी दुर्गा उभी राहिली पाहिजे. प्रत्येक दानवाचा अंत ठरलेला आहे. तो कोणामुळे होणार आहे, कसा होणार आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे. दानवांची माया समजून घेऊन तिला नष्ट करण्यासाठी सर्व प्रकारचे अस्त्र, शस्त्र व बुद्धिमत्ता यांचा वापर करावा लागेल. महिषासुर सुद्धा एकटा नव्हता त्याच्यासोबत सुद्धा त्याची सेना होती, बलाढ्य राक्षस होते. महिषासुराला संपविण्यासाठी या सर्वांचाच निःपात करणे गरजेचे होते. तसेच आजही देश विरोधी शक्तींना वेगवेगळे न समजता त्यांना महिषासुराचे सहयोगी समजूनच त्यांना समाप्त करावे लागेल. यासाठी केली जाणारी शक्तीची उपासना हेच महिषासुरमर्दिनीचे आवाहन ठरेल.

## नवरात्रीच्या निमित्ताने महिला सक्षमीकरण जाणून घेऊया...



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**नवरात्रीमध्ये स्त्री शक्तीचे प्रतीक असलेल्या दुर्गा देवीची पूजा केली जाते. चला तर मग आज महिला सबलीकरणाबद्दल बोलूया पण वेगळ्या पद्धतीने... आजही आपल्या समाजात महिलांची सुरक्षा एक अरिष्ट आहे. काही पुरुषांचा महिलांबाबतचा दृष्टिकोन समाजातील सर्व महिलांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारा आहे. युनिसेफच्या वेगवेगळ्या अहवालांनुसार, महिलांना दररोज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अनेक संकटांचा सामना करावा लागतो. पण, या छोट्या-छोट्या गोष्टी (पुरुषांच्या दृष्टीने, जरी त्यांचा स्त्रियांवर परिणाम होत नसला तरी) धोकादायक स्वरूप धारण करतात जेव्हा पुरुष आपली मर्यादा आणि माणुसकी विसरून महिलांवर शारीरिक हिंसा आणि लैंगिक अत्याचाराचा अवलंब करतात.**

रस्त्यावर अश्लील टिप्पण्या किंवा बलात्काराच्या घटनांमध्ये महिलेचा कोणताही दोष नाही. अशा घटना सर्व वयोगटातील, सर्व उंचीच्या, सर्व सामाजिक स्तरातील आणि सर्व प्रकारच्या कपड्यांतील मुलींसोबत घडू शकतात आणि अशी अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या कपटी जगात आपली सुरक्षा ही आपली मोठी जबाबदारी आहे. वडील, राजकारणी आणि ज्याला संधी मिळेल ते महिलांना त्यांच्या गैरवर्तनासाठी जबाबदार धरायला मागेपुढे पाहत नाहीत. 'रात्री उशिरा घराबाहेर पडू नका', 'डोक्यापासून पायापर्यंत झाकून ठेवा' अशा निरर्थक कल्पना ऐकायला येतात. स्त्री सबळ आहे.अत्याचाराचा सामना करण्यासागे सामर्थ्य स्त्री मध्ये आहे.ती अबला नाही,सबला आहे. मुलींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. . आज आपण कन्या संरक्षण आणि महिला सक्षमीकरणाचा अर्थ काय हे समजून घेण्याचा प्रयत्न करू. महिला अत्याचार सातत्याने घडत आहेत. गेल्या आठवड्यात१४ वर्षीय शिवानीनेही लखनऊमध्ये जीव दिला. ते सर्व हुशार होते, पण आतून असुरक्षित होते. म्हणूनच मनाचा पराजय हा मनाचा पराभव असे म्हटले आहे.

**मुलींनाही पराभव व्यवस्थापनाचा मंत्र माहित असावा**

महिला सक्षमीकरणाची पहिली पायरी म्हणजे मुलांना आतून सशक्त बनवणे. जिंकण्याची सवय लागणे ही चांगली गोष्ट आहे, पण पराभवाचा सामना करण्याचा मंत्रही मुलींना शिकवावा लागेल. आमच्या मुली गुणवंत व्हाव्यात, अव्वल व्हाव्यात यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करतो, पण पराभव किंवा तणाव कसा सांभाळायचा हे आम्हाला शिकवत नाही. मुली थोड्याशा अपयशाने किंवा दबावाने तुटतात. महिला सक्षमीकरण म्हणजे मुलींमध्ये सहन करण्याची क्षमता विकसित करणे. तेव्हा ही कथा काळजीपूर्वक वाचा जी तुम्हाला पराभवाचा सामना करण्याचा मंत्र शिकवते. आपल्यापैकी बहुतेक तरुणांसाठी, विशेषतः मुलींसाठी हा एक महत्त्वाचा धडा आहे. यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन्ही बाजू आहेत. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की अपयश कधीही अंतिम नसते आणि ते मरण्यासारखे घातक नसते. यश कधीच कायमस्वरूपी नसते आणि उशिरा किंवा नंतर अपयशाची चव आपल्या सर्वांनाच घ्यावी लागते.

**एका गुणवंत विद्यार्थ्याची गोष्ट**

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे एक अतिशय गुणवंत विद्यार्थी होता. त्याला विज्ञानात नेहमी 100 टक्के गुण मिळाले. त्यानंतर त्याची आयआयटी मद्रासमध्ये निवड झाली. तेथेही त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. त्यानंतर तो एमबीएसाठी कॅलिफोर्निया विद्यापीठात गेला. त्याला अमेरिकेत मोठ्या पगाराची नोकरी मिळाली आणि तो तिथेच स्थायिक झाला. त्याने एका सुंदर तमिळ मुलीशी लग्न केले, 5 खोल्यांचे मोठे घर आणि आलिशान कार खरेदी केली. त्याला यशस्वी म्हणायचे सर्वकाही होते. मात्र काही वर्षांपूर्वी त्याने पत्नी आणि मुलांना गोळ्या घालून आत्महत्या केली. त्याच्या आयुष्यात कुठे चुकलं?

**कुठे गोंधळ झाला**

कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ सायकोलॉजिकल मेडिसिनने त्याच्या केसचा अभ्यास केला आणि गोंधळ कुठे झाला हे शोधून काढले. संशोधकाने मुलाच्या मित्रांची आणि कुटुंबीयांची मुलाखत घेतली. अमेरिकेच्या आर्थिक संकटामुळे या मुलाची नोकरी गेली होती आणि तो बराच काळ बेरोजगार होता अशी माहिती मिळाली आहे. पूर्वीच्या पगाराच्या रकमेपेक्षा खूपच कमी पगारावर काम करायला तो तयार होता पण त्याला नोकरी मिळाली नाही. घराचा हप्ताही तो भरू शकला नाही. घरही हाताबाहेर गेले. तो आणि त्याचे कुटुंब बेघर झाले. त्यांनी काही दिवस प्रचंड त्रासात घालवले. त्यानंतर त्याने पत्नी आणि मुलांवर गोळ्या झाडून आत्महत्या केली. या केस स्टडीने असा निष्कर्ष काढला की त्याला यश हाताळण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले होते परंतु अपयशांना सामोरे जाण्यासाठी प्रशिक्षित केलेले नव्हते.

**अपयशाला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण यशाचा मंत्र**

आता खऱ्या मुद्द्यावर येतो, अत्यंत यशस्वी लोकांच्या सवयी काय असतात? तुम्हाला यशाचे मंत्र शिकवणारे अनेक लोक भेटतील, पण आज ही वस्तुस्थिती समजून घ्या की तुम्ही आयुष्यात खूप काही मिळवले असले तरी क्षणात तुम्ही सर्व काही गमावून बसण्याची शक्यता आहे. पुढच्या क्षणी काय होणार आहे, हे कोणालाच माहीत नाही, जगात पुढचे आर्थिक संकट कधी येईल हेही कळत नाही. त्यामुळे अपयशाचा सामना करण्यासाठी स्वतःला प्रशिक्षित करणे हा सर्वोत्तम यशाचा मंत्र आहे.

या नवरात्रीमध्ये प्रत्येक पालकांना विनंती केली जाते की त्यांनी आपल्या पाल्याला यश मिळवण्यासाठी तयार करावे परंतु त्यांना अपयशाला सामोरे जाण्याचे प्रशिक्षण देखील द्यावे. विज्ञान आणि गणिताचा उच्च क्रमाचा अभ्यास केल्यास त्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळण्यास मदत होईल, परंतु जीवनाचे सार समजून घेतल्यास त्यांना प्रत्येक समस्येचा सामना करण्यास आणि त्यावर मात करण्यास मदत होईल. पैशासाठी काम करण्याऐवजी पैसा कसा काम करतो ते शिकवा. त्यांच्यामध्ये उत्साह आणि जीवनाची आवड निर्माण करा. जिथे पदवी चालत नाही, तिथे जगण्याची हौस रस्ता ओलांडताना दिसते. मुलींना जगायला शिकवा आणि हेच खरे महिला सक्षमीकरण आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सप्तधान्य आणि नवरात्र जागर



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**आनंदाच्या या घटाची स्थापना करून उमेदीची ज्योत अखंड उजळून ठेवण्याचा प्रवास हा नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये अखंड चालू राहणार. रोज एक प्रसन्न माळ या घटाभोवती सजणार. रोज नवरूप घेऊन शक्तीरुपी देवी सामर्थ्याचा आशीर्वाद आपल्याला देऊ करणार या नऊ दिवसांमध्ये सात धान्याला अतिशय महत्त्व असते. यामध्ये मातीत घट रुजण्याची इवलसा कोंब होऊन फुटण्याची प्रत्येक बिजाला अपेक्षा असते. जिद्दीचा उमेदीचा आणि सत्याचा दिवा अक्षय उजळत ठेवण्याची परंपरा; तसेच सृजनाची कहाणी एक वेगळीच असते सारं पोटात सामावून घेत पुन्हा पुन्हा नव्या उमेदीने जगायचं न डगमगता आपल्या भोवती आखलेल्या सीमा तोडून, नवी वर्तुळ लागून यश गाठायचं. हे प्रत्येक स्त्रीच्या मनात रुजलेलं असतं.**

घर जबाबदारी या सगळ्या गोष्टी पेलवत पेलवत नऊ दिवस भक्तीचा आणि आनंदाचा जोगवा मागत या नवरात्रीला आपण साजरा करत असतो. या देवी सर्वभूतेषु शक्ती रूपे न संस्थिता.... या स्तूतिवचनांनीच आपण देवीची नऊ दिवस पूजा अर्चना करत असतो. आपण तिला आंबा, गौरी, दुर्गा, काली, चंडी, लक्ष्मी, रेणुका, आदिशक्ती, महालक्ष्मी,शारदा अशा वेगवेगळ्या नावांनी आपण तिला ओळखत असतो. तिची पूजा अर्चना करत असतो. देवीच्या या रूपातच "कायजननसामर्थ" शक्ती दडलेली असते. अर्थातच सुर्जनाची नवनिर्मितीची क्षमता म्हणजेच ही देवीचे रूपे होय. नवरात्र उत्सवात नऊ दिवस दीपगर्भाची पूजा अगदी भक्ती भावाने केली जाते. नऊ दिवस हा दीप विश्वासाने भक्तीने तेजाने श्रद्धेने तेवत ठेवला जातो. घटाची स्थापना ही सृष्टी विकास कामाची एक प्रतिकृती आहे असे सहज आपल्याला म्हणता येईल. संख्या तत्त्वज्ञानाच्या प्रकृती पुरुष या सिद्धांताला देखील हा गरबा नृत्य गरबा नृत्य खेळणं या सगळ्या गोष्टी या प्रतिकारामागील एक शास्त्रीय सत्य आहे. असही मी ऐकलेलं आहे. आश्विन शुद्ध प्रतिभेपासून घटस्थापना केली जाते आणि यामध्येच सप्तधाण्याला देखील महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. यात सत्ताधान्यांची रुजवन केली जाते. हिरवळ बीज अंकुरत नवधनाने संपूर्ण घट या नऊ दिवसांमध्ये बहरून जातो आता नवरात्रीमध्ये सप्तधान्य का तर या सप्त धान्यांना देखील एक विशेष महत्त्व आहे. या सप्तधन्यांची पेरण करून नवशक्तीचा जागर केला जातो. गहू, जवस, तीळ, मूग, राळेसाळे व चने यांची रुजवण केली जाते. ही धान्य अंकुरित करून एक प्रकारे सृष्टीतील हरित निर्मितीची पूजा केली जाते. धरत्रीचा गर्भ नवरात्रीच्या डोळ्यात तेल घालून कसं जपलं पाहिजे हे शिकवणारा हा सण आहे. नवरात्रात नऊ दिवसाच्या उपवासाला देखील महत्त्व आहे. काहीजण दिवसातून एक वेळी भोजन करतात काहीजण उठता बसता उपवास करतात; तर काही ठिकाणी धान्य फराळा करता धान्य भाजून घेतली जातात. त्यामुळे ती पचनासाठी सोपी होतात अश्विन नंतर येणारे कार्तिक महिन्यात दाळी व धान्य वर्ज केले जातात. त्यामुळे नवरात्री दरम्यान धान्य फराळाचं सेवनात शरीराला प्रथिने भरपूर पुरवठा होतो. व पुढे कार्तिकार धान्य बंद म्हणूनच या नऊ दिवसाच्या नवरात्र उत्सवामध्ये





या सप्तधाण्यांच्या सेवनाला अतिशय महत्त्व आहे. या प्रत्येक धान्याचे एक वेगळा महत्व आहे. आरोग्याची काळजी घेणार धान्य फराळातलं महत्त्वाचा घटक शरीरातील सिग्नता पेरणारे थकवा दूर करणारे पित्तावर औषध पोषक थंडी पळवणारे असे अनेक उपयोग या धान्यांचा आहे. त्यामधील पहिला धान्य म्हणजे "जव" उपासाच्या व्रताच्या वेळी केल्या जाणाऱ्या सात्विक आहारामध्ये जवसाचा उपक्रम आहे. यामध्ये ओमेगा-ड फॅटी आहेत. म्हणून याच्यामध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते. आणि स्त्रियांची आरोग्यता जपून ठेवण्याचं काम हा जवस करत असतो. आता "गहू" महाराष्ट्रातल्या रोजच्या आहारामध्ये गव्हाचा उपयोग सर्वाधिक केला जातो. गहू गुणांनी गोड, सिग्न आणि थंड व पचनास जड आहेत शरीरातील वातपित्त दोषांना कमी करून कफ दोष वाढवणारे आहेत चवीला रुचकर असल्याने सर्वांनाच गव्हाची पोळी आवडते गव्हापासून शरीराला पोटॅशियम व कॅल्शियम मिळतं त्यामुळे या सप्तधन्यांमध्ये गव्हाचं महत्त्व दुसऱ्या स्थानावर आहे. त्यानंतर येतात "तीळ" एक तीळ सात जणांनी वाटून खावा! अशी आपल्याकडे म्हणचं आहे. याचं कारण आहे. तिळातील स्निग्धता जी शरीरातील कणांना एकत्रित करून ठेवण्यास मदत करते ती सांध्याचा व हाडांच्या आरोग्या करता अतिशय चांगले आहे. त्यामुळे भाकरीचा कोरडेपणा घालवण्यासाठी भाकरी मध्ये तीळ वापरले जातात. अशी परंपरा ही आपल्या संस्कृतीमध्ये आढळते. यानंतर "मूग" मुगाचा वापर मुख्यतः थकवा दूर करण्यासाठी केला जातो नवीन धान्याच्या तुलनेमध्ये हे पचनास जड असते व पित्त दोषही वाढवणारे असते; परंतु शारद मुगाला आहारासाठी प्रस्ताव प्रशस्त मानले आहे; परंतु नवीन धान्य नेहमी भाजून खाल्ली जातात आणि धान्य फराळी पदार्थांमध्ये मुगाची भाजी खाल्ल्यास तिचे सहज पचन होते. आणि मूग डोळ्यांच्या आरोग्यासाठी देखील उत्तम असते. "राळे" संस्कृतीमध्ये कुंगू असेही म्हणतात; परंतु राळे हे मोठ्या प्रमाणामध्ये अजिबात खाऊ नये, असा पदार्थ नाही. चवीला रुचकर लागणारे गोड व थंड गुणाचे राळे उपवासाच्या पदार्थांमध्ये हे पारंपारिक धान्य आहेत. राळे खाल्ल्यानंतर लवकर भूक लागत नाही. विशेषताः मात्र राळे गर्भात घडवणारे असल्याने गर्भात न यांचं सेवन न केल्याचं बरं असतं असही डॉक्टर सल्ला देतात. मोडलेल्या हाडांना जुळवण्यास मदत करणारे असे याचा आयुर्वेदिक वर्णन देखील आढळतो. "सावे" याला तर पोषण आहारात समावेश आढळतो उपवासानिमित्त ज्या धान्याचा आपण आहारात फार कमी वेळा वापर करतो. त्याचे सेवन घडावं व सर्व प्रकारचे पोषण तत्व शरीरात मिळावा हा उद्देश नवरात्रीत सफल होताना दिसून येतो. सावे सर्वांना पथ्यकर आहार म्हणून देखील उपयुक्त आहे. चवीला थोडा गोड, व तुरट परंतु पचनास ही सावे क्वचित वातदोष वाढवणारे असतात; मात्र या दिवशी मुद्दाम सामान्य आहारामध्ये समावेश करतात. तसे सावेचे विविध पदार्थ म्हणून ते बनवून खाल्ले जातात. चणे म्हणजेच हरभऱ्याची डाळ असे म्हणतात. काळा, लाल, पिवळा व पांढरा असे चण्यांचे त्यांच्या रंगानुसार चार प्रकार पडतात. चणे भाजून त्यांची त्यापासून फुटाणे तयार केले जातात. ते अतिशय पौष्टिक असतात. फुटाण्यांच्या सेवनाने अनेक आरोग्य विषयक त्रास दूर होतात. देवीच्या नव्यादित्यातील खास पदार्थांपैकी चणे हा एक आहे. ज्याने अतिशय रुक्ष व गुणधर्मातील गुणधर्माचे असल्यामुळे वात प्रकोपक असतात. त्यामुळे शरीरातील वायू संबंधित विविध प्रकारच्या पचनाकृतीने निर्माण होतात; परंतु अशक्तपणा घालवण्यासाठी व शरीरातील थंडी दूर करण्यासाठी चण्याचे कढण फार उपयोगी असते. म्हणून चण्याचे या सप्तधाण्यांमध्ये एक महत्त्व आपल्याला दिसून येते. या सप्त धान्यांमधून आपल्याला विविध पौष्टिक गुणधर्म त्याचा बरोबर शरीराला मिळणारे एक जीवनसत्व मॅग्नेशियम, कॅल्शियम अशी अनेक प्रकारची पोषण तत्वे मिळत असतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढते आणि यामध्ये स्त्रियांच्या आरोग्यालाही उत्तम राखलं जातं. म्हणजेच ही नवरात्र उत्साहाबरोबरच आरोग्यदायी सुद्धा ठरते आपली परंपरा आणि संस्कृती ही नेहमीच गुड आहे त्यातून आपल्याला आरोग्य मन शरीर या सगळ्यांची जपवणूक करता येते. या नवरात्र उत्सवात या सप्तधान्यांचा उपयोग करून आरोग्याचे वरदान मिळवूया. हा नवरात्री उत्सव असाच अखंड ऊर्जेचा आणि आपला सर्वांना सुखदायी जावो यासाठी भरभरून शुभेच्छा!

# नवरात्र उत्सव आणि दुर्गामाता दौड



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आधुनिक केसरी

**अजूनही दुर्गामाता दौडविषयी लोकांना तितकसं माहित नाही. शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजीराव भिडे गुरूजी यांनी 1985 साली दुर्गामाता दौड़ीची सुरवात केली. दुर्गामाता दौड़ीचा उद्देश्य असा असतो की नवरात्रात धावत जाऊन देवीचे दर्शन घ्यायचे आणि तिची आरती करून तरुणांमध्ये राष्ट्राप्रति लोकजागृती निर्माण करणे असा आहे.**

नवरात्र उत्सव म्हटला म्हणजे घराघरातील स्त्रियांची सुरु असलेली तयारी. पितृपक्षात नवरात्र उत्सवासाठी संपूर्ण घराची साफसफाई, घटस्थापनेची तयारी करताना घरातील स्त्रिया आढळतात. हा नवरात्र उत्सव संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आपापल्या पद्धतीने सार्वजनिक मंडळातील मूलं पूर्ण श्रद्धापूर्वक देवीची स्थापना करून तिला साज श्रृंगार घालून तिच्यासमोर रोज गरबा, संस्कृतिक कार्यक्रम ठेऊन रोज देवीची मनोभावे आरती करून नवरात्र उत्सव साजरा केला जातो.

घराघरातील पुरुष मंडळी स्त्रिया उपवास करतात. ज्याची जशी श्रद्धा तसा उपवास केला जातो. मौनव्रत, पाय अनवाणी, फ़क्त फराळ, संध्याकाळी एकवेळ सोडून, घराघरात घट बसवले जातात. मातीचा घट आणून एका नव्या कोऱ्या टोपलीत काळी माती टाकून त्यात घट ठेवला जातो आजुबाजूला गहु टाकून सामोर पाटावर सर्व देवघरातील देव ठेऊन तेलाची ज्योत लावली जाते ही ज्योत नऊ दिवस विझु नये याकडे पुरेपुर लक्ष दिले जाते. नऊ दिवस रोज वेगवेगळी माळ चढवली जाते सकाळ संध्याकाळ मनोभावे आरती केली जाते.

अष्टमीला फुलोरा म्हणून सांजोरी, गोड पुऱ्या, जिलेबी चढवला जातो. घराघरातील स्त्रिया नवरात्रित जे नऊ कलर असतात त्यप्रमाणे साड्या घालतात. नऊ दिवस देवीचा पाठ केला जातो.

अजूनही दुर्गामाता दौडविषयी लोकांना तितकसं माहित नाही, शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजीराव भिडे गुरूजी यांनी 1985 साली दुर्गामाता दौड़ीची सुरवात केली. दुर्गामाता दौड़ीचा उद्देश्य असा असतो की नवरात्रात धावत जाऊन देवीचे दर्शन घ्यायचे आणि तिची आरती करून तरुणांमध्ये राष्ट्राप्रति लोकजागृती निर्माण करणे असा आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन संभाजी भिड़े गुरूजींनी तरुणांमध्ये छत्रपती शिवरायांचा इतिहास आपल्या भाषणातून सांगून त्यांच्यात देशाविषयी



प्रेम जागवले.पुणे, मुंबई, कर्नाटकसह मराठवाडा अश्या बऱ्याच ठिकाणी दुर्गामाता दौड़ आयोजित केलीं जाते. ज्या जिल्ह्यात देवीचे मंदिर असते तिथे मंदिरासामोर हजारोंच्या संख्येने तरुण भगवा फेटा, पांढरा कुर्ता असा वेष परीधान करून हातात भगवा झेंडा घेऊन तिथुन धावायला सुरवात करतात.

शहरातील मुख्य मार्गावरून दुर्गामाता मंदिराजवळ येऊन दुर्गामाता दौड़ थांबते. तेथे देवीची मनोभावे पूर्ण श्रद्धापूर्वक आरती होते. परत तिथुन पुन्हा शहरातील विविध भागात दुर्गामाता दौड़ सुरु होते. प्रत्येक ठिकाणी दौड़ीचे मोठ्या उत्साहात स्वागत होते.

घरोघरी दारांसमोर रांगोळ्या काढल्या जातात. घरावर भगवा झेंडा उभारला जातो. फटाक्यांच्या जल्लोषात दुर्गामाता दौड़ीचे स्वागत केले जाते. परत फिरून ती दुर्गामाता दौड़ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळ्याजवळ येऊन दौड़ीची सांगता होते. नऊरात्रात नऊ दिवस ही दौड़ चालते. विजयादशमीच्या दिवशी दौड़ीची सांगता होते. शिवप्रतिष्ठानच्या दुर्गामोहिमेची घोषणा ही केली जाते, संभाजी भिड़े गुरूजी यांनी सुरु केलेली ही दुर्गामाता दौड़ अगदी छोट्यातल्या छोट्या खेड्यापासून तर मोठ्यातल्या मोठ्या शहरात सर्वीकडे आयोजित केली जावी यासाठी आजच्या तरुण पिढीने पुढे यावं आणि संभाजी भिड़े गुरुजीची या दुर्गा माता दौडीत सहकार्य करावं जेणे करून आपल्या शिवरायांचा इतिहास सर्वापर्यंत पोहचेल. जसे शिवराय जिजामातेच्या गर्भात असताना जिजामातेला डोहाळे लागले होते. तलवारबाजी, ढाल हातात घेऊन लढण्याचे.त्यांनी भगवदगीता, रामायण, दासबोधसारखे ग्रंथ वाचले तेव्हा विर पराक्रमी शिवराय घडले. तसाच आजचा प्रत्येक मुलगा जन्माला येण्यापूर्वीच त्याच्यावर शिवरायांच्या इतिहासाची छाप पडावी.

# 'गुगल' गुरूचा वाढदिवस!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# जागतिक विकासाचा "आधारस्तंभ" पर्यटन



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी


**जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे. जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे. पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने 1980 पासुन "27 सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस" साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने 27 सप्टेंबर 1970 ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते. पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावीत असते.**

आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्व शांतीचा दुत आहे. पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते. त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू,वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान मिळेल.त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे. भारतात 28 राज्ये व 8 केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते. भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात.कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते.भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते.भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने 2019 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी 10 पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य,किल्ले,काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत.पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन "ह्युस्टन"येथील "हाऊदी मोदी"कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते. कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात. ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला वाचविले पाहिजे.वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान,भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे.जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा "स्टॅच्यु ऑफ युनिटी" भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे.आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव-दानव,ऋषि-मुनी,साधु-संत,वेषभुषा,पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा,थोरमहात्म्यांचा व क्रांतीकारकांचा इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते.भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात 317 गडकिल्ले आहेत यातील फक्त 96 गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही 221 गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही.सरकारने स्वतःचे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा फायदा आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे. भारतात आजही औरंगाबादला "पर्यटनसिटी"म्हणुन संबोधल्या जाते.पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोरे येण्याची गरज आहे. यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल,पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल. या दृष्टीकोनातून 27 सप्टेंबरला संपूर्ण जगाने "संकल्प"केला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.



विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते.पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना तयार होते.परंतु जानेवारी 2020 पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना "ग्रहण" लावल्याचे आपण पहाले."अतीथी देव भव" म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी "चीन विषेला साप" झाला आहे.जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.परंतु "चामगाधड चीनी चांडालांनी" पर्यटनावर ग्रहण लावल्यामुळे पर्यटनापासुन येणारे अर्थसहाय्य संपूर्ण देशांचे बंद झाले होते.परंतु आता पर्यटन स्थळे हळूहळू पुर्ववत होत आहे.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या सहा महिन्यांपासून युक्रेन -रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे.याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात.कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.यावर्षी इंडोनेशियातील बाली येथे 27 सप्टेंबरला अधिकृतरित्या जागतिक पर्यटन दिवस साजरा केला जाणार आहे यात अनेक देशांचे मान्यवर उपस्थित रहातील. जो की विकासाचा आधारस्तंभ म्हणून ओळखला जाईल.यामुळे पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे. यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

# !! तुळजापूरची तुळजाभवानी !!





सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

## उत्सव देवीचा

आधुनिक केसरी

भारतात आदी मायेची 18 शक्तिपीठे आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात साडेतीन पीठे आहेत. तुळजापूर , कोल्हापूर , वणी आणि माहूर . महाराष्ट्रातील शक्तिपीठांमध्ये तुळजापुरला विशेष असे महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे .सोलापूरच्या उत्तरेस 45 किलोमीटर अंतरावर व उस्मानाबादच्या दक्षिणेस 23 किलोमीटर अंतरावर बालाघाट डोंगराच्या 609 मीटर उंचीच्या पठारावर तुळजाभवानी चे छोटेसे गाव वसलेले आहे. तुळजाभवानीचे मंदिर खूप प्राचीन असून त्यास मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे. मुघलांच्या काळात तुळजाभवानीच्या मंदिराची बरीच नाजदुस केली गेलेली होती. नंतर श्री शिवछत्रपती महाराजांनी मंदिराची दुरुस्ती करून घेतली. मंदिरात प्रवेश करीत असताना उजव्या हातात गोमुख आहे. तर डाव्या हाताला कल्लोळतीर्थ आहे. कल्लोळात स्नान करून देवीच्या मंदिरात दर्शनासाठी जाण्याची पूर्वापार रूढी परंपरा आहे. देवीच्या मंदिराचा मोठा प्रशस्त परिसर आहे. मंदिराची बांधणी आकर्षक आणि सुंदर आहे. देवीच्या पूजा ..आर्चेचे संपूर्ण कार्य पुरोहितांकडे सोपवण्यात आलेले आहे. नवरात्र उत्सवात प्रतिपदेला तुळजापुरात पहाटेच तुळजाभवानी देवीची स्थापना सिंहासनावर करण्याची परंपरा आहे. मात्र घटस्थापना दुपारी 11 ते 12 वाजेपर्यंत करण्यात येते. नवरात्रीच्या या नऊ दिवसात चाललेल्या उत्सवाच्या कालावधीत तुळजाभवानीची पहाटे व रात्री अशी दोन वेळेस अभिषेक पूजा ..अर्चा अत्यंत यथा संगपणे केली जाते. तुळजापुरा प्रमाणेच महाराष्ट्रात सर्वत्र अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस दुर्गादेवीच्या उत्सवाची सुरुवात अतिशय जल्लोषात केली जाते. भाद्रपद कृष्ण अष्टमीच्या दिवशी सायंकाळी तुळजाभवानीची महापूजा केल्यानंतर देवीची मंचकी निद्रा सुरू होते. देवी झोप घेत असलेल्या कालावधीत



मंदिरातील परिसरात पूर्ण शांततामय वातावरण आपणास दिसून येते.
तुळजाभवानीची मूर्ती खूप सुरेख आहे. ती काळ्या कुळकुळीत " गंडगी." या पाषाणापासून तयार केलेली आहे .नवरात्राच्या नऊ दिवसाच्या उत्सवात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण तुळजापूरला येतात आणि भक्ती रसात न्हाऊन जातात. मुखाने देवीची गाणी गात.. गात मंदिर परिसरात नाचताना दिसतात. गोंधळ जागरण ही देखील मंदिरात केली जातात. त्यामुळे सारे मंदिरातील वातावरण मंगलमय होऊन जाते.
देवीची पालखी पलंग नवरात्रीच्या रात्री बारा वाजता निघते. अश्विन शुद्ध दशमीच्या पहाटेच तुळजापूरच्या देवीची यात्रा सांग पूजा अर्चा करतात. त्यावेळी तुळजाभवानीच 108 नऊवारी साड्या नेसवल्या जातात. या नेसवलेल्या साड्यांना " दिंड " असे संबोधले जाते. नंतर ही सजवलेली तुळजाभवानीची सुंदर मूर्ती पालखी ठेवली जाते. मंदिराच्या परिसरात मग पालखीतून प्रदक्षिणा पूर्ण केली जाते .दहा ते बारा चौरस फूट उंचीच्या असलेल्या चबुतरावर पालखी ठेवली जाते. त्यानंतर देवीस परंपरागत पद्धतीनी ओवाळले जाते. आरती केली जाते .त्यानंतर साखर भाताचा नैवेद्य दाखवला जातो.
विजयादशमीच्या दिवशी सिमोल्लंघना नंतर भिंगारेतून वाजत गाजत आणलेल्या पलंगावर तुळजा भवानीच्या देवीची मूर्ती झोपवीली जाते. नंतर देवी निद्रिस्त होऊन जाते... ती कोजागिरी पौर्णिमेपर्यंत. तुळजापुरात या कोजागिरी पौर्णिमे उत्सवाला " पलंगी पौर्णिमा उत्सव " अशी असा म्हणण्याचा प्रघात आहे.
अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत चाललेल्या या मंगल सोहळ्याच्या सांगतेच्या वेळी तुळजापूर प्रमाणे इतर देवींच्या मंदिरात विधी सर्वच मंदिरातून केलें जातात. देवीस अवतार किंवा रूप देण्याची प्रथा प्रचलित आहे .दशमीला देवीने महिषासुराचा वध केला. म्हणून महिषासुर मर्दिनीचा अवतार दिला जातो. महिषासुराचा वध करून देवीने विजय संपादन केला म्हणून त्या दिवशी विजयादशमीचा उत्सव साजरा करण्याची परंपरा आजही कायम आहे .तो दिवस म्हणजे विजयादशमीचा अशा या तुळजापुरातील विजयादशमीच्या उत्सवात सहभागी झाल्यानंतर मिळणारा आनंद शब्दातून सांगता येणार नाही हे बाकी खरे...



# आरती दुर्गादेवीची..

आधुनिक केसरी

**धाव पाव देवी आता तिमिर पसरला...
घेऊनी अवतार मारी काम क्रोधाला....ll**

**मद, मोह, दंभ, मत्सर, माजले भारी...
तुझे दर्शन होता ,सारे पळतील कंधारी...ll**

**त्रिगुणात्मक हे रुप तुझे, त्रिभुवनसुंदरी...
आष्टभूजा तू देवी, आमचे रक्षण करी...ll**

**ब्रह्मा विष्णू रुद्र, तुझे पूजन करती...
आदिमाया शक्ती, तूची दिव्य ज्योती...ll**

**भव सागर पार करण्या, देई तू शक्ती ....
आले शरण तुजला, करते तुझीच भक्ती ...ll**

**अत्याचार, अनाचार भरलासे जगती...
अधर्माचे असूर नित्य नर्तन करती...ll**

**जागृत होई देवी आता सोडी निद्रेला....
आम्हावरी काळ आता कठिण पातला...ll**

**प्रगट होऊनिया देवी, वारी दुरितांना....
अभयदान ते द्यावे, देवी आम्हा भक्तांना..ll**


© सौ. अनघा पतके. खंडाळा, जि.सातारा. 9764860296...

# महाराष्ट्राला भुरळ पाडणारा सप्तश्रृंगी गड

आधुनिक केसरी

बंडू खडांगळे

लखमापुर : सप्तश्रृंगी हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. तो वणी ता.दिंडोरी जवळील नांदुरी गावाजवळ वसलेला असुन अनेक कुटुंबांची कुलदैवत असलेल्या सप्तश्रृंगी देवीचे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. हे महाराष्ट्रातील देवीच्या असलेल्या देवीची साडेतीन पीठांपैकी अर्धपीठ आहे. ब्रम्हादेवाच्या कमंडलू पासून निघालेल्या गिरिजा महानदीचे रूप म्हणजे सप्तश्रृंगीदेवी असे मानले जाते. आदिशक्तीचे मुळ स्थान आहे.





देवीचे अठरा भुजा सप्तशृंग रूप पाहावयास मिळते. ही देवीची मुर्ती स्वयंभू आहे. अशी आख्यायिका पाहायला मिळते. येथील गाभाऱ्याला शक्तिव्दार,सुर्यव्दार,आणि चंद्रव्दार, असे तीन दरवाजे आहेत. या तिन्ही दरवाजांतुन देवीचे दर्शन घडते.

हे स्थान जिल्ह्यात नाशिकपासून उत्तरेस ५५ किलोमीटर आंतरावरील दिंडोरी कळवण तालुक्यांच्या सरहद्दीवर आहे. हे स्थान सह्याद्रीच्या पुर्व पश्चिम डोंगररांगेत पाहायला मिळते. सह्याद्रीच्या पठारावर असलेले हे तिर्थक्षेत्र समुद्रसपाटीपासुन सुमारे ४५६९ फुट उंचीवर आहे. येथे माकडांची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. देवीच्या पर्वताला प्रदक्षिणा घालता येते. मात्र हा मार्ग अतिशय खडतर आणि धोकादायक आहे. नांदुरी गावांतून गडावर पायी जाण्यासाठी रस्ता आहे. पायी जाण्यासाठी अनेक भाविक येथून सुरुवात करतात.

गडावर जाण्यासाठी बसगाड्या नाशिक, सीबीएस, व दिंडोरीनाका येथून मिळतात. तसेच उत्सव काळात जास्तीच्या एस.टी.बसेसची सोय करण्यात आलेली असते. नवरात्र काळात जळगाव, अंबळनेर,येथून कळवण मार्गे देवीचे भक्त पाय वाटेने येतात. गडाच्या पायथ्याशी नांदुरी हे एक छोटे से गाव आहे. गडावर जाण्यासाठी बसगाड्या येथून ही मिळतात.त्यामुळे गडावरचा प्रवास भाविक भक्तांना सुकर होत असतो.

.....गडावरील इतर ठिकाणे
कालीकुंड, सुर्यकुंड, जलगुंफा
शिवतीर्थ, शितकडा,
गणपती मंदिर, गुरूदेव आश्रम

....गडावर राहण्याची व भोजनाची सोय :-
भाविकांना गडावर निवासाच्या सोयीसाठी ट्रस्टने धर्मशाळेमध्ये १९० खोल्या उपलब्ध केलेल्या आहेत. धर्मशाळा कार्यालय २४ तास उघडे असते. धर्मशाळेच्या खोलीसाठी आरक्षण पध्दत नाही. गडावर आल्यानंतर खोली मिळेल व खोली एका दिवसासाठी मिळते.

संस्थानातर्फे केवळ १५ रूपये देणगी मुल्यामध्ये पोटभर प्रसादाची ,भोजनाची सोय करण्यात आली आहे. पौर्णिमा, नवरात्र, व चैत्रात भाविकांसाठी सकाळी ११ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत प्रसादाची व भोजनाची व्यवस्था केलेली असते. एका वेळी दोनशे ते तीनशे माणसे बसण्याची सोय उपलब्ध आहे.

# नवशक्तीचे नऊ रंग



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

अलौकिक, सांस्कृतिक विविधतेने संपन्न भारत जगात आपली वेगळी ओळख टिकवून आहे ! भारतीय सांस्कृतिक परंपरांना मोठं सामाजिक अधिष्ठान आहे. इथले सणसमारंभ आपलं वेगळेपण जपतांना इथल्या समृद्ध लोक संस्कृतीचं दर्शन घडवतात. इथे विविध सण-उत्सव मोठ्या हर्षोल्हासात साजरे केले जातात. यातील काही सण-उत्सव हे एक किंवा दोन दिवसांचे, तर काही आठ-दहा दिवसांचे आहेत. यामागे मोठ्या धार्मिक-सांस्कृतिक लोकपरंपरांचा दैदिप्यमान इतिहास आहे !

विविध सणांपैकी शारदीय नवरात्रोत्सव हा नऊ दिवसांचा उत्सव असून यामागे प्राचीन इतिहास आहे.
याचा उल्लेख विविध भारतीय ग्रंथ-पुराणामध्ये आढळून येतो. शारदीय उत्सवाचा प्रभाव कसा असेल ( ?) हे मार्कंडेय पुराणामध्ये
सर्वाबाधा विनिर्मुक्तो धनधान्य सुतन्वितः|
मनुष्यो मत्प्रसादेन भविष्यति न संशयः||
असे आढळते. म्हणजे, देवीची मनोभावे उपासना करणाऱ्याला कसलीच बाधा होणार नाही, तिथे सर्वकाळ भरभराट असेल !

देवीची उपासना म्हणजे स्त्री शक्तीची उपासना ! हा नवरात्रोत्सव म्हणजे स्त्री शक्तीचे सर्वकाळ सक्षमीकरण ! मुलतः या उत्सवामागे कृषीसंस्कृती असून, मातृसत्ताक कुटुंब पद्धतीच्या काळात हा उत्सव सुरु झाला. हा कृषीविषयक होता, ज्यामध्ये घटस्थापनेच्या द्वारा बियाण्यांची उगवण क्षमता तपासली जायची, तसेच स्त्री शक्ती ही प्रधानशक्ती असल्याकारणाने
यादेवी सर्वेभूतंषू मातृरूपेण संस्थितः नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।
मंत्रजपाने नऊ दिवस तिचे पूजन व्हायचे. ती माता आहे ! ती सृजनशील आहे ! ती जगतजननी आहे ! तिला वारंवार वंदन केले पाहिजे, तिचे पूजन केले पाहिजे. नवरात्रोत्सव हाच सर्वोच्च स्त्रीशक्तोत्सव संपन्न



दुसरा दिवस -रंग लाल !

होणे अपेक्षित आहे ! नऊ दिवस मोठ्या भक्तिभावाने देवींचे पूजन केले जाते. प्रत्येक दिवशी ती वेगळे रूप-रंग घेऊन येते. दुसऱ्या दिवशी ती 'ब्रह्मचारिणी'च्या रुपात असून या वर्षी दुसऱ्या दिवशी ती लाल रंग परिधान करते आहे. लाल रंग सुद्धा मूळ रंगांपैकी एक ! लाल रंग म्हणजे सामर्थ्य, उत्कटता ! रक्ताचा रंग लालच ! संपूर्ण सृष्टी ज्या मानवाच्या आधारे चलन-वलण करते त्याचे रक्त लालच ! सकाळ आणि सायंकाळ सुद्धा लालच ! अन्न निर्मात्या सूर्याचा रंग लाल ! असा हा लाल रंग घेऊन आलेली शक्तीदायिनी, ब्रह्मचारिणी माता आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडवते आहे! लाल रंग त्यागाचे प्रतिक आहे. स्त्रीच्याभाळी सौभाग्य लक्षण कुमकुम लाल रंगाचे ! श्रीकृष्ण भक्तीत रममाण गवळणी कशा अंतर्बाह्य लालेलाल झाल्यात ? याचे वर्णन संत कबीरजी करताना
लाली मेरे लाल की, जित देखूँ तित लाल |
लाली देखन मैं गई, मैं भी हो गई लाल ||
जिथे देव-भक्त हे एकरूप झाले आहेत.

आज आपणही आपले जीवन या त्याग-शक्ती-उत्कटतेच्या भावाने, लाल रंगाने बहरून टाकूयात ! आज स्त्री, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. असे असले तरी हुंडाबळी आणि तीचा छळ थांबलेला नाही. तेंव्हा चला, नवरात्रोत्सव साजरा होतांना प्रत्येक घरांत असलेल्या सर्वशक्तीमान स्त्रीचा म्हणजेच आई-पत्नी-बहिण-कन्या-मैत्रीण आणि अन्य रुपात नांदत असलेल्या विविधरूपी स्त्री शक्तीचा सन्मान करूया! आजमितीला स्त्रीला सर्व लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन समानतेचे स्थान देणे गरजेचे आहे! ती अबला नाही तर सबला आहे ! हा आत्मविश्वास तिच्या हृदयात जागृत करूयात! असे झाल्यास तीच्यातील अखंड मातृत्वाचा नित्य सन्मान होईल आणि खऱ्या अर्थाने घराघरांतील नांदणारी देवी प्रसन्न होऊन संपूर्ण मानवजात आनंद-सुखी-समाधानी होईल!
श्रीब्रह्मचारिणी माता की जय!



# तू गेल्यानंतर

आधुनिक केसरी

माय, आज तुझी लय आठवण आली...
तु मला सोडून गेली
अन् माझं अवसानच गळून पडलं...
तुह्या लुगड्याची वाकय छातीशी घेवून,
तुह्या आठवणीत मी दिवस-दिवसभर
हमसून-हमससून रडत असतो...
माय,तुच माझी जींदगी होतीस ग अन् तुच माझा श्वास होतीस...
पण माय या नियतीने डाव साधला ग...
एक सागू माय, तु जरी जगाचा निरोप घेतला ना तरी
माझं मन यावर विश्वास ठेवायला
अजूनही तयारच नाही...
तुझ्या आठवणीत डोळ्याच्या कळा आजही ओल्याचिंब होतात माझ्या...
हुंदक्यांना आवर घालताना माझी आजही फार दमछाक होते...
पोरके पणाची चाहूल स्वस्थ बसू देत नाही मला...
अलगद येवून बिलगावं तुला आणि निपचीत पडाव तुझ्या कुशीत...
माय,काळजाच्या चींध्या-चिंध्या झाल्या आज माझ्या...
मायेच आभाळ तर केव्हाचच फाटलं ग माझं...
तूच सांग, कसा निघणार दाटलेल्या
कंठातून माय हा शब्द आता... अनाथांची दुनीया मला
आता सारखी खुणावत असते...
त्यात परकी लोकं फार त्रास देतात तुझ्या लेकराला...
माय,,,,तुझी आठवण आली की मी थेट स्मशानात जाते,,,,
जीथं तुला जाळलं तीथच घेते मग लोटांगण...
आणि मारते तुला घट्ट मिठी... अश्रूंचा बांध तेथेही फुटतोच ...
मग माझ्या डोळ्यातून पाझरणाऱ्या अश्रूंच्या थेंबाना
तु अलगद तुझ्या लुगड्याच्या पदराने पुसतेस...
आणि मारतेस मला मिठी...माझा आकांत पाहून
तुलाही गहिवरून येतं ग... मग त्या स्मशानात सुरू होतो
युगायुगाचा आक्रोश दोन जीवाचा..
माय लेकिच्या फाटलेल्या काळजाचा...
\दाटलेल्या मणाचा आणि आटलेल्या अश्रूंचा...
बेचीराख झालेल्या दोन आयुष्याचा...
आक्रोश ऐवढा की,त्याने नीयतीलाही पाझर फुटावा...
आणि मायलाही तीथंच पुन्हा पान्हा सुटावा...

सागरकुमार झनके,
9822575244.

# जुनी पेन्शन योजना तत्काळ लागू करावी

## विविध मागण्यांसाठी शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी, रिक्त जागा भराव्यात, राज्यातील निकषपात्र विना अनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान द्यावे, अशैक्षणिक कामे बंद करावीत यासह इतर प्रमुख मागण्यासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण, शिक्षक आणि शिक्षणाशी सबंधित घटकांची स्थिती यावर अवलंबुन असते. ज्या देशांनी शिक्षणास सर्वोच्च प्राधान्य दिले तेदेश जगात मानवी विकासाच्या बाबतीत अधिक पुढे आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतात अनेकशिक्षण आयोगाने वारंवार सांगूनही शिक्षण क्षेत्राकडे धोरणकर्त्यांचे अक्षम्य स्वरूपाचेदुर्लक्ष झाले आहे असेच म्हणावे लागेल. महान शैक्षणिक वारसा असलेले महाराष्ट्र राज्यदेखील यास अपवाद नाही. राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिकधोरणामुळे राज्यातील शिक्षण विभाग समस्याग्रस्त बनला आहे. राज्यकर्त्यांनीस्वतःसाठी आकर्षक पेन्शन योजना लागु करून घेतलेली असतांना शिक्षक, प्राध्यापक ,मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मात्र अतिशय कुचकामी आणि दीर्घकालीनविपरीत परिणाम करणारी अंशदायी पेन्शन योजना लागू केली आहे. शिक्षण क्षेत्राशी सबंधित इतर घटकाचे प्रश्नदीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. ही नाराजी व्यक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाजमन घडवणारी शिक्षक-प्राध्यापक मंडळी मोर्च्यांच्या माध्यमातून आपला रोष व्यक्त करीत आहे. यानिमित्ताने पुढील मागण्याच्या पुर्ततेसाठी मराठवाडा शिक्षक संघ जालनाच्यावतीने लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय, यांचे मार्फत निवेदन सादरकरीत आहोत. या मागण्यांचा साकल्याने विचार करून लवकरात लवकर निकालीकाढण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी सुर्यकांत विश्वासराव, राजकुमार कदम, ज्ञानोबा वरवटे, डॉ. मारोती तेगमपुरे, डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, रमेश आंधळे, संजय येळवंते, प्रेमदास राठोड. आरेफ कुरेशी, गौतम बनसोडे, नारायण मुंडे, जगन वाघमोडे, भीमाशंकर शिंदे, गणेश चव्हाण. दिपक शेरे, तुकाराम पडघम, पी. यू. काकड. हकीम पटेल, भगवान धनगे







# अहिराणी साहित्य परिषद संस्थेच्या वतीने पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अहिराणी साहित्य परिषद संस्था धुळे मार्फत दरवर्षी साहित्यिकांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या वर्षांचा साहित्य पुरस्कार कै.ब.ना कुंभार गुरूजी, प्रा.आबा नंदू पाटकरी यांच्या गोधडी नी ऊब या भाषांतरीत संग्रहास कै.अॅड.नानासाहेब झु. भि. पाटील साहित्य पुरस्कार प्रकाश रतन महाले यांच्या देव बोकड्यानी मानूसकी या कादंबरीला श्रीमती सीता बाई शंकर माळी साहित्य पुरस्कार पुन्हा बघु कुंभार यांच्या अहिराणी साहित्य संशोधन व संकलन अहिराणी हिरद राजसबाईनं पितांबर गणपत पाटील साहित्य पुरस्कार, श्रीमती लतिका चौधरी यांचा काव्यसंग्रह निय आभाय या संग्रहास देण्यात आला. पुरस्कारार्थीनां २१०० सन्मान चिन्ह शाल श्रीफळ गुच्छ देवून गौरविण्यात आले.

पुस्तकाचे परीक्षण प्रा.डॉ.फुला बागुल ,प्रा.डॉ.सदाशिव सुर्यवंशी. प्रा.सदाशिव माळी प्रा.भगवान पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य सदाशिव माळी , माजी आमदार शरदराव पाटील. डॉ अरूण कुमार साळुंखे श्रीमती शकुंतला बोरसे यांच्या हस्ते करण्यात आला. पुरस्कारार्थीनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे, माजी आमदार शरदराव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सचिव प्रा.भगवान पाटील यांनी अहवाल वाचन केले.सर्व पुरस्काररर्थींचा परिचय आणि सूत्रसंचलन करून आभार मानले. या कार्यक्रमास प्रा. रमेश राठोड, डॉ. क. वि. संघवी, सुरेखा पाटील, कलावती माळी, करूणा पाटील, श्रीमती जनाबाई पाटील, मंगला साळुंखे, कृष्णा सनेर, विश्राम बिरारी जे.बी. पाटील, राजाराम माळी, पी.सी. पाटील मान्यवर उपस्थित होते.

# फिल्मी स्टाईलने चालकाचा खून : आरोपी गजाआड

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** व्यक्ती बऱ्हाणपूर येथे जाण्यासाठी ड्रायव्हर दीपक विष्णू दाभाडे, कैलासनगर यांची स्विफ्ट डिझायर कार या आरोपींनी शिक्रापूरपर्यंत प्रवास करून गाडी मालकाची लूटमार करून त्याचा खून करण्यात आला होता व स्विफ्ट डिझायर कार सोन्याचे अंगठी मोबाईल व एटीएम कार्ड असे ८ लाख १८ हजार रुपये किमतीच्या वस्तू घेऊन फरार झाले होते. काही दिवसांपूर्वी धुळे शहरातील मालेगांव रोडवरील सुयोग लॉज येथे थांबलेले जगतारजागिर सिंग, रा. विजय नगर एस.पी. रोड अॅन्टॉप हिल, मुंबई ३७ मुळ रा. उदंनगल खुर्द, तहसिल बाबर बकाला उदं नगल अमृतसर पंजाब, सूर्य प्रकाश जय प्रकाश पाण्डेय रा.कुरभर लामकाने दुबेपुर, सुल्तानपुर उत्तर प्रदेश व त्यांचे सोबतचे २ इसमांनी नियोजनबध्द कट कारस्थान करुन ड्रायव्हर दिपक विष्णु दाभाडे कैलासनगर धुळे याची स्विप्ट डिझायर कार बऱ्हाणपुर येथे जाण्यासाठी भाडयाने घेवून गेले होते. वरील चारही आरोपींनी ड्रायव्हर दिपक विष्णु दाभाडे यांचेसह त्यांचे कारमधुन बहानपुर जिल्हयातील शिकारपुरापर्यंत प्रवास करून तेथे दिपक दाभाडे याचे कडुन जबरीने ८,१८,००० / - रुपये किंमतीच्या वस्तु त्यात पांढरे रंगाची स्विप्ट डिझायर कार, सॅमसंग कंपनीचा जे ७ मॉडेलचा मोबाईल, बोटामधील सोन्याची ४ ग्रॅम वजनाची अंगठी, सेंट्रल बँकेचे एटीएम एयु फायनान्स कंपनीचे क्रेडीटकार्ड , बजाज फायनान्सचे कार्ड तसेच गाडीचे व त्यांचे कागदपत्र त्यामध्ये वाहन चालविण्याचा परवाना, आर सी बुक, इन्शुरन्स, आधारकार्ड पॅनकार्ड आणि तीन हजार रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल जबरीने चोरुन घेवुन , त्याचा खुन करुन त्याचे प्रेत शिकारपुरा पोलीस ठाणे हद्दीत फेकुन दिले होते दिपक दाभाडे याची पत्नी वनिता दाभाडे हिचे फिर्यादी वरुन धुळे शहर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता . वय सदर गुन्हयाचे तपासात धुळे शहर पोलीसांनी आरोपीतांनी चोरुन नेलेल्या स्विप्ट डिझायर कारची टोल नाक्यां कडुन माहिती घेवून सदरचे वाहन राजस्थान राज्यातील चुरू जिल्हयातील सरदार शहर पोलीस ठाणे हद्दीत तेथील पोलीसांचे मदतीने दि .०५ / ० ९ / २०२२ रोजी पकडले असुन वाहनात ड्रायव्हर दिपक दाभाडे याचा खुन करुन फरार झालेले आरोपी ( १ ) जगतारसिंग उर्फ सोढी जगिरसिंग शेरगीर वय ३६ रा . उधोनगढखुर्द , तहसिल बाबा बकाला जिल्हा अमृतसर ( पंजाब ) ( २ ) सुर्यप्रकाश जयप्रकाश पांडे य २३ रा लमकना दुबेपुर पोस्ट कुडेमार जि . सुलतानपुर ( उत्तरप्रदेश ), ( ३ ) ओमप्रकाश महावीर प्रसाद मेहरीया वय २४ रा . गांगीयासर पो.स्टे. बिसाऊ ता. मलसीसर जि. जुंजन ( राजस्थान ) , ( ४ ) आशिष ओमप्रकाश यादव वय २३ रा धर्मवली गाव थाना लोटन, जि. सिध्दार्थ नगर ( उत्तरप्रदेश ) यांना पकडण्यात येवून त्यांचे कडुन पिस्टल सारखे घातक हत्यार जप्त करण्यात येवून त्यांचे विरुध्द सरदार शहर पो. ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ५३३ / २०२२ भादंविक ११५ सह आर्म अॅक्ट ३,२५ ( ६ ) , ४ , २५ , ३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला . त्यानंतर सदर आरोपी हे राजस्थान मधील भिलवाडा जिल्हयातील सुभाष नगर पोलीस ठाणे गुन्हा रजि . नं . ०४७३ / २०२२ भादंविक ३०२ या गुन्हयात निष्पन्न झालेले आहेत . धुळे शहर पोलीसांनी वेळीच समय सुचकतेने आरोपीतांनी जबरीने चोरुन नेलेल्या स्विप्ट डिझायर कारचा टोल नाक्यावरील माहितीच्या आधारे मागोवा घेत सदर वाहन व आरोपी सुमारे १ हजार किलो मिटर अंतरावर राजस्थान राज्यातील चुरू जिल्हयातील सरदार शहर पोलीस स्टेशनच्या पोलीसांच्या मदतीने पकडल्याने आरोपीतां कडुन पिस्तोल सारखे घातक शस्त्र हस्तगत करून त्यांचेविरुध्द दाखल २ खुनाचे गुन्हे उघडकिस आलेले आहेत सदरची कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर अधीक्षक प्रशांत बच्छाव, उप विभागीय पोलीस अधीक्षक ईश्वर कातकाडे यांचे मार्गदर्शनाखाली धुळे शहर पोलीस ठाण्यातील पो.निरी. नितीन देशमुख, दादासाहेब पाटील, तिगोटे, दिपक धनवटे, विजय जाधव, दिपक सैदाणे, प्रसाद बाघ, विवेक साळुंखे, भावेश झिरे व पवनकुमार परदेशी यांनी ही कामगिरी केली.

# प्रोडक्ट शोकेस कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वसई :** वसईमधील विद्यावर्धिनी कॉलेज महाविद्यालयीन शिक्षण आणि ऑफ इंजिनिअरिंग अँड औद्योगिक क्षेत्रातील अंतर कमी करणे टेक्नॉलॉजीतर्फे शुक्रवार, २३ स्पटेंबर आहे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट रोजी प्रोडक्ट शोकेस हा कार्यक्रम पार आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पडला. या कार्यक्रमाची सुरुवात हरिश वणकुद्रे म्हणाले. दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिश विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात औद्योगिक वणकुद्रे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन कंपन्यांमध्ये जाऊन नवनवीन तंत्रज्ञान प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात शिकण्याची संधी मिळते. ते तंत्रज्ञान आले. या कार्यक्रमामध्ये कॉम्प्युटर, आत्मसात करून, महाविद्यालयातील आयटी, एआय (डीएस), सीएसई इतर विद्यार्थ्यांना ते शिकवण्यार्च (डीएस), सिव्हिल, मेकॅनिकल, संधी त्यांना मिळेल, असेही है इन्स्ट्रमेंटेमेशन आणि ईएक्सटीसी या म्हणाले. सर्व विभागांचा समावेश होता. यावर्षी सुमारे ७५ विविध औद्योगिक प्रोडक्ट शोकेस हा कार्यक्रम २००५ कंपन्यांचे प्रोडक्टस् महाविद्यालयामध पासून दरवर्षी मोठ्या उत्साहात आले होते. तसेच शाळा आणि महाविद्यालय स्तरावर आयोजित केला महाविद्यालयातील जवळपास १२८ जातो. यामध्ये विविध औद्योगिक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला हजेर कंपन्यांचे प्रोडक्ट्स प्रत्यक्ष लावली. अतिशय उत्साहात आणि महाविद्यालयात आणले जातात, शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रम पान त्यामुळे या कार्यक्रमाची ते वाट बघत पडला.



# नर्सेस ऑफ इंडियातर्फे आदर्श नर्सिंग शिक्षक पुरस्कार सोहळा

## डॉ. दीपाली उमाळे ठरल्या पुरस्काराच्या मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सायन रुग्णालय परिचर्या प्रशिक्षण केंद्र आणि नर्सेस ऑफ इंडिया यांच्यामार्फत परिचर्या प्रशिक्षण कार्यामध्ये मोलाची कामगिरी बजावणाऱ्या व शिक्षण क्षेत्रात आपले अमूल्य असे योगदान देऊन उत्तमोत्तम सर्वगुणसंपन्न परिचारिका घडवणाऱ्या शिक्षकांचा त्यांना स्मृतीचिन्ह ,पुष्पगुच्छ व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

यामध्ये परिचर्या संवर्गात निपुण शिक्षकांचा गौरव करण्यात आला डॉ. सोनोपंथ जोशी (प्रोफेसर डायरेक्टर सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी पुणे) यांनी देश विदेशातील अभ्यास करून सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी येथील परिचर्या प्रशिक्षण हे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे. त्याबद्दल त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले , दुसऱ्या



मान्यवर डॉ. शोभा गायकवाड (असिस्टंट प्रोफेसर एस एन डी टी युनिव्हर्सिटी) या अभ्यासू प्रवृत्तीच्या व परिचर्या क्षेत्रातील अगाध ज्ञान असलेल्या तसेच ज्ञानदानाच्या कार्याची त्यांना अप्रतिम आवड असून त्यांना पुरस्कृत करण्यात आले. तिसऱ्या पुरस्कारप्राप्त डॉ. मनीषा शिंदे या सोलापूर शासकीय रुग्णालय येथे प्राचार्या असून परिचारिकांच्या हक्कांसाठी चालणारी त्यांची धडपड व प्रशिक्षणार्थ्यांना शिकवण्याची त्यांची जिद्द यासाठी त्यांना पुरस्कृत करण्यात आले, चौथ्या डॉ. दिपाली नरेंद्र उमाळे ( महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालय परेल )येथे पाठनिर्देशिका म्हणून कार्यरत असून परिचर्या प्रशिक्षणार्थींना शिकवण्याची जिद्द व तळमळ प्रत्येक वेळेस नवनवीन उपक्रम राबवून शिकवण्याची धडपड तसेच परिचारिकांसाठी आणि रुग्ण तसेच वैद्यकीय क्षेत्राबद्दल वर्तमानपत्रे व मीडिया मध्ये सातत्याने लेखन याबद्दल त्यांना पुरस्कृत करण्यात आले. पाचवी मान्यवर शिक्षिका तंजीन आलम या सायन रुग्णालय परिचर्या प्रशिक्षण केंद्र येथे सहाय्यक प्राचार्या म्हणून कार्यरत असून विद्यार्थिनींसाठी असलेली त्यांची धडपड व जीव ओतून मुलींसाठी असलेली शिकवण्याची तळमळ प्रत्येक परिचर्या क्षेत्रातील हाती घेतलेले कोणतेही काम पार पाडण्याची जिद्द या बद्दल या पाचही शिक्षक वृद्धांना बेस्ट टीचर २०२२ या वर्षासाठी यांची निवड नर्सेस ऑफ इंडिया यांच्यामार्फत करण्यात आली. व कार्यक्रमास श्री सुभानंद शिंदे, सी. इ.ओ. नर्सेस ऑफ इंडिया, श्रीमती हांडे मॅडम आधिसेविका सायन रुग्णालय, श्रीमती प्राजक्ता पाटील मॅडम प्राचार्य सायन रुग्णालय, श्रीमती पेडणेकर, प्राचार्य नायर रुग्णालय यांच्यातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. रमा देसाई प्राचार्या भगवती रुग्णालय, डॉ. वंदना सदभैय्या प्राचार्य सेंट जॉर्ज रुग्णालय, शालिनी अब्राहम मॅडम असिस्टंट लेक्चरर तेरणा कॉलेज ऑफ नर्सिंग तसेच श्रीमती उज्वला निकाळजे आणि सर्व सायन परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक वृंद, शिकाऊ परिचारिका, जनरल सेक्रेटरी एम एस एन यू श्री रियाझ सर तसेच श्री मोटे सर यांची उपस्थिती होती.

# पावसाची उघडीप आणि द्राक्षे पंढरीतील छाटणीची लगीनघाई!!

## मजूर आणि मजुरी समीकरण जुळवताना अडचणी



यंदा दिंडोरी तालुक्यात पावसांने आपले रौद्र रूप दाखविल्याने सध्याच्या मितीला तालुक्यातील सर्व धरणे पुर्णपणे पाण्यांने भरलेली आहे . पावसांची विक्रमी नोंद यंदा तालुक्यात झाल्याने अजुनही बहुतेक ठिकाणी च्या द्राक्षे बागेमध्ये पाणी साचल्याचे चित्र दिसत आहे . त्यामुळे यंदा द्राक्षे पंढरीतील बळीराजा मोठ्या प्रमाणावर चिंतेच्या चक्रात अडकला आहे . परंतु सध्या तीन दिवसांपासून पावसांने पोबारा केल्याने द्राक्षे पंढरीतील छाटणी वैगरे कामांना गती प्राप्त झाली आहे . परंतु मजूर व मजुरी ,फवारणी औषधे, खते यांच्या गगनचुंबी किंमती मुळे यंदाचा द्राक्षे हंगाम घेतांना बळीराजांला तारेवरची कसरत घ्यावी लागणार असे चित्र सध्या तालुक्यात द्राक्षे पंढरीत दिसत आहे .

**छबुराव मटाले, द्राक्षे उत्पादक शेतकरी, पालखेड बंधारा, ता .दिंडोरी**

आधुनिक केसरी न्यूज

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात सध्या पावसांने उघडीप दिल्याने तालुक्यातील द्राक्षे पंढरीत ऑक्टोबर च्या द्राक्षे छाटणीची लगीनघाई मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे सध्या द्राक्षे पंढरीतील शेतकरी वर्ग मजूर आणि मजुरी यासाठी मोठ्या प्रमाणावर मेहनत घेत आहे.

गेल्या कित्येक दिवसांपासून दिंडोरी तालुक्यात पावसाने कहर केल्यामुळे दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होत असताना याचा शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे द्राक्ष पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या या तालुक्यांमध्ये ऑक्टोबर द्राक्ष बाग छाटणीला शेतकरी धोका पत्करून सुरुवात करत असल्याचे पहावयास मिळत आहे.

वास्तविक पाहता तालुक्यामध्ये सप्टेंबर महिन्यामध्येच हळूहळू सुरुवात होत असते परंतु यावर्षी पावसाची विक्रमी नोंद झाल्याचे दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये एक प्रकारे या पावसाची दहशत निर्माण झाल्याने या शेतकऱ्यांचे द्राक्ष बागेचे नियोजन कोलमडले. असे असताना देखील आता शेतकऱ्यांनी धोका पत्करून द्राक्ष बागा छाटणीला सुरुवात केली आहे.

दिवसेंदिवस रासायनिकखते लिक्विड,औषधे यांचे दर वाढत असल्याने साधारणता एका एकरला छाटणीसाठी पेस्ट,मजुरी, वातावरणानुसार औषधे फवारणी, शिवाय वेगवेगळ्या रोगांचे प्रादुर्भाव घालवण्यासाठी ही फवारणी करावी लागते. त्यासाठी एकरी द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना दहा ते पंधरा हजार रुपये खर्च येतो.

द्राक्ष छाटणी टप्प्या टप्प्याने केली असता बाजारपेठेत भाव मिळण्याची शक्यता असते परंतु या पावसा मुळे हे नियोजन बिघडले असून पुढे काय याची चिंता शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

मात्र असे असले तरी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाल्याने यामुळे शेतकऱ्यांना थोड्या प्रमाणात का होईना दिलासा मिळाला असून तालुक्यात आता द्राक्षबागांच्या छाटणीला शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.



# कवितेचा हक्काचा मंच आता संभाजीनगरमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क कवितेचा मंच आता नवोदितासाठी लिहिणाऱ्या प्रत्येकासाठी संभाजी नगर शहरात काहीतरी नवा प्रयोग करू पाहत आहे,




एक शेर एक कविता या घोषवाक्यातून कवितेसाठी काहीतरी नवं आणि हटके करण्यासाठी एकमेव मंच संभाजीनगर मध्ये सुरु करण्यात आला आहे, क कवितेचा मंच महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून स्थापन झाला अन त्यानंतर आतापर्यंत या मंचने तीन काव्य मैफिली केल्या आहेत, पहिली काव्य मैफिल संभाजीनगर येथे, दुसरी पुणे येथे आणि तिसरी कवितेची बाग ज्योतीनगर येथे आयोजित केली, सर्व प्रकारच्या काव्यामुळे मैफिलींना उदंड व उत्स्फूर्त असा प्रतिसाद अनुभव व नवोदित कवींना लाभला यापुढे मोठे कार्यक्रम आयोजन करण्याचे क कवितेचा मंचाचे ध्येय आहे. जेणेकरून तळागाळातील नवोदित व चांगले लिहीणा-या लेखकांसाठी एक व्यासपीठ भेटावं याच हेतूने पुढे जात आहे, संपूर्ण महाराष्ट्रभर काम करण्याचे क कवितेच्या मंचाने ठरवले आहे. क कवितेच्या मंचाच्या कार्यक्रमासाठी शैलेश देशपांडे अविनाश काटवते, ज्ञानेश्वरी फड, दीपक हापट , श्रद्धा बहाळसकर, विशाल मगर ,सतीश शिंदे ,प्रतीक्षा जाधव , तुषार गवळी, विनायक दास व इतर मेहनत घेत आहेत. क कवितेचा मंच सध्या व्हाट्सअप, इंस्टाग्राम सोशल मीडियाच्या माध्यमातून सक्रिय आहे जरी कोणाला जॉईन व्हायचे असेल तर आपण खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधू शकता. संपर्कासाठी - क कवितेचा मंच +919373078241

# महाराष्ट्ररत्न पुरस्काराने राष्ट्रीय खेळाडू आर्यदीप लोंढे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत यांचेकडून सुवर्णलक्ष्य राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध राष्ट्रीय मैदानी खेळाडू आर्यदिप लोंढे यांच्या क्रीडा क्षेत्रातील भरीव कामगिरीची दखल घेऊन सिनेआर्क प्रोडक्शन, नागपूर-मुंबई. चित्रपट, मालिका, वेबसिरीज आणि जाहिरात निर्मिती क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या प्रोडक्शन हाऊस मार्फत त्यांना नुकताच 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार' हा अत्युच्य मानाचा अलौकिक असा पुरस्कार देण्यात आला.



अमृत भवन, आंध्रा असोसिएशन हॉल, नागपूर येथे झालेल्या सोहळ्यात राष्ट्रीय क्रीडा गिनीज रेकॉर्ड होल्डर सतनाम सिंग सिद्, चार्टर्ड अकाऊंट्स असोसिएशनचे अध्यक्ष साकेत बागडिया, भारतीय वन सेवा माजी संचालक निशिकांत जाधव, इंडियन डर्ट ट्रॅक रेसिंगचे राष्ट्रीय अध्यक्ष मेहरनोष मावालवाला आणि पुरस्कार सोहळ्याचे आयोजक तथा सिनेआर्क प्रॉडक्शन्सचे सर्वेसर्वा विनोद खैरे यांचे प्रमुख उपस्थिती पार पडला. मास्टर ऑफ सोशल वर्कर्स या अंतिम शैक्षणिक वर्षाची परीक्षा चालू असल्याकारणाने पुरस्करर्थी आर्यदिप लोंढे यांना सदर पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहता न आल्याने आयोजक श्री. विनोद खैरे यांनी "महाराष्ट्र रत्न सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह" पोस्टाने घरपोच पाठविले. आर्यदिप लोंढे हे दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेचे उपाध्यक्ष असून मैदानी खेळा सोबत ते समाजसेवा कार्यात सदैव सक्रिय असतात.

राष्ट्रीय खेळाडू आर्यदिप लोंढे हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे आणि समाजसेविका शारदा लोंढे यांचे पुत्र आणि लेखक, दिग्दर्शक आर्य लोंढे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. क्रीडा, कला आणि सांस्कृतिक विभागातून त्यांचेवर संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# साहित्यिक डी. के. शेख यांना गदिमा साहित्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** येथील कवी, गीतकार, लेखक डी.के.शेख यांच्या बघू नका मुखडा वळू वळू या लावणीसंग्रहास पुणे येथील महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद भोसरी व गदिमा कुटुंबियांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय गदिमा साहित्य पुरस्कार जाहीर झाला असून त्याचे वितरण 1 ऑक्टोबर रोजी भोसरी येथे कविवर्य रामदास फुटाणे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात पदमश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते होणार आहे.

उस्मानाबाद येथील नगर वाचनालय येथे कार्यरत असणाऱ्या



डी.के. शेख यांचे आजपर्यंत 9 काव्यसंग्रह, 3 संपादित ग्रंथ प्रकाशित झालेले असून अनेक गाणी संगीतबद्ध झालेली आहेत. त्यांच्या 'दंगल आणि इतर कविता' या संग्रहास 9 राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले असून या संग्रहाचा साहित्य अकादमी प्राप्त कवी अस्लम मिर्झा यांनी फसाद और दिगर नजमे या नावाने उर्दू अनुवाद केला असून तो 2019 साली प्रकाशित झाला आहे. त्यांच्या कविता हिंदी,उर्दू, गुजराती भाषेत अनुवादित झालेल्या असून त्यांचा विद्यापीठीय अभ्यासक्रमातही समावेश झालेला आहे. मराठी सोबतच दखनी भाषेतून ते लेखन करतात.

त्यांचा दखनी भाषेतील ऐसा तो घड्या नई ना? हा लक्षवेधी कवितासंग्रह प्रकाशित असून खट्टी ईमली की मिट्टे बेरां हा दखनी बोलीतील बालकवितासंग्रह देवनागरी व फारसी लिपीत एकत्र प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

# अंबाजोगाई जिल्हानिर्मितीसाठी शिवसंग्राम कायम सोबत

## डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे : शासकीय विश्रामगृह अंबाजोगाई येथे बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या अपघाती निधनानंतर शिवसंग्राम संघटनेची जबाबदारी डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्यावर आली असून शिवसंग्रामच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी डॉ. ज्योतीताई मेटे या अनौपचारीक दौऱ्यामध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुकानिहाय आढावा घेत आहेत. अंबाजोगाई तालुक्याची बैठक शासकीय विश्रामगृह अंबाजोगाई येथे आज डॉ. ज्योतीताई मेटे, भारतीय संग्राम परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकरअप्पा कोलंगडे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद, महिला जिल्हाध्यक्षा ॲड .मनीषाताई कुपकर, महिला जिल्हा सरचिटणीस साक्षीताई हंगे, केज तालुका अध्यक्ष नामदेव बप्पा गायकवाड, सोशल मीडियाचे दीपक कोल्हे पांडुरंग आवारे पा. यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी अंबाजोगाई शिवसंग्रामचे ता.अध्यक्ष धनेश गोरे, ता.उपाध्यक्ष जयसिंह ढगे, जि.सरचिटणीस सुनील आडसुळ, ता.कोषाध्यक्ष योगेश शेळके, ता.सरचिटणीस प्रदीप पाटील आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. शिवसंग्राम संघटनेचा अधिकृत पक्ष भारतीय संग्राम परिषद



जिल्ह्यातील सर्वच निवडणूका लढवणार असल्याने सर्व कार्यकर्ते निवडणुक लढवण्यास तयार राहा असे डॉ. ज्योतीताई मेटे म्हणाल्या. तसेच जिल्हाध्यक्ष प्रभाकरअप्पा कोलंगडे व जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद यांनी आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महत्वाचे मार्गदर्शन केले. अंबाजोगाई जिल्हा व्हावा ही स्व. मेटे साहेबांची इच्छा होती. त्यासाठी शासन दरबारी पुढील काळात पाठपुरावा करु. आपण अंबाजोगाई जिल्हा कृती समिती सोबत कायम सोबत असून जिल्हा कृती समिती शिष्टमंडळासमवेत अंबाजोगाई जिल्हा निर्मिती साठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेण्याचे आश्वासन यावेळी दिले. तसेच अंबाजोगाईच्या विकासाच्या दृष्टीने अंबाजोगाईत रेल्वे असणे आवश्यक असून घाटनांदूर -अंबाजोगाई हा मार्ग करण्यासाठीही पाठपुरावा करणार असल्याचेही यावेळी श्रीमती.मेटे यांनी सांगितले. तसेच अंबाजोगाई येथील जुना रिंग रोड हा पूर्णतः शहरात आलेला आहे. त्यामुळे वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे.
नवीन रिंग रोड साठी पाठपुरावा करू असे बैठकीदरम्यान ठरविण्यात आले.
या बैठकीत शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष धनेश गोरे यांनी स्वर्गीय मेटे साहेबांच्या विचारांचा वारसा पूर्ण ताकतीने पुढे घेऊन जाऊ असे मत व्यक्त केले.....!




# औषधी विक्रेता संघाच्या वतीने वर्ल्ड फार्मासिस्ट डे निमित्त आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** समाजाचे आरोग्य व स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी झटणाऱ्या औषधी विक्रेत्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी औषधी विक्रेता संघ पुसद च्या वतीने आज सर्व विक्रेत्यांच्या साठी हेल्थ चेक अप कॅम्पचे आयोजन केले. औषधी विक्रेता संघ पुसद, आयकॉन हॉस्पिटल तसेच सुनेत्रा नेत्रालय पुसदच्या वतीने सर्व औषध विक्रेत्यांची फुल बॉडी कॅम्प, डेण्टल चेकअप व आय चेकअप करण्यात आले. याकार्यक्रमाला यवतमाळ डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या संघटन सचिव सुरज डुबेवार, महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या अमरावती झोनचे राजेश कोटलवार, सचिव सुशांत महल्ले, ज्येष्ठ केमिस्ट धनंजय आहाळे, कोंडबाराव पाटील, समीर भास्करवार दिलीप अनंतवार, आयकॉन हॉस्पिटल चे संचालक गजानन मॅडमवार आयकॉन हॉस्पिटल चे डॉ. आदित्य सौंदनकर, डॉ. साक्षी राठोड सुनेत्रा नेत्र चिकित्सालय चे डॉ. उमेश रेवनवार डॉ. विनीत रेवनवार उपस्थित औषधी. प्रास्ताविक श्री सुरज डुबेवार, सूत्रसंचालन व आभार सुशांत महल्ले यांनी मानले. कार्यक्रमासाठी गजानन गादेवार, स्वप्निल गवळी, संतोष तडकसे रणवीर टाले, मनीष गायकवाड यांनी सहकार्य होते. सदर कार्यक्रमाला पुसद शहरातील औषधे विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# कवी सुनील लोणकर यांच्या कवितासंग्रहाचे थाटात प्रकाशन

## कविता कवीसाठी शब्दांचा श्वास असते : कवी डॉ. दासू वैद्य




आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सभोवतालच्या घटना घडामोडींवर कवीची नजर असते. संवेदनशीलपणे भवताल कवितेत टिपणे तितकेसे सोपे काम नसते. खरे तर कविता ही कवीसाठी शब्दांचा श्वास असते, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी डॉ. दासू वैद्य यांनी शनिवारी ( ता. २४) प्रकाशन समारंभात बोलताना केले.
शहरातील विद्युत कॉलनी परिसरातील सिद्धिविनायक गणेश मंदिर सभागृहात कवी-गझलकार सुनील लोणकर यांच्या 'सर्वव्यापी कचऱ्यात राहून सुद्धा' या कवितासंग्रह प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील प्रसिद्ध कवी सतीश सोळांकुरकर हे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मराठी विभागाचे प्रमुख तथा ख्यातनाम कवी डॉ. दासू वैद्य, चित्रकार श्रीधर अंभोरे, रेल्वेचे निवृत्त अधिकारी अशोक लोंढे, कवी संजय जाधव, प्रकाशक काशिनाथ भारंबे, अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष तथा कवी-पत्रकार डॉ. सुहास सदाव्रते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना कवी दासू वैद्य म्हणाले, की आज साहित्य लेखनाच्या प्रकारात कमालीच्या प्रतिमा आणि प्रतीके बदलली आहे. भवताल जेव्हा कवीला अस्वस्थ करतो तेव्हाच खऱ्या अर्थाने कविता जन्म घेते. कवितेचा आशय आणि विषयाचा परामर्श घेत विविध कवितांचा संदर्भ देत कवी वैद्य यांनी कवितेचा बदलत जाणारा प्रवास उलगडून दाखवला. कवितेचे मूळ हे माणसाचे जगणे आणि माणूसपण शोधणे असे प्रयोजन असावे, असेही सांगितले. कवी सुनील लोणकर यांच्या कवितासंग्रहावर भाष्य करताना डॉ. सुहास सदाव्रते म्हणाले की, कवितेचा विषय हा कवीच्या मनातील एक सुप्त कोपरा असतो. कवितासंग्रहातील कवितांचा संदर्भ देत अत्यंत साध्या आणि सोप्या शब्दांतून जगण्याचे संदर्भ कवितेचे विषय होत असल्याचे सांगितले.
एक मनस्वी प्राजंळ भूमिकेतून जसे आहे तसे जीवनाचे संदर्भ कवितेतून प्रामुख्याने येत नव्या बदलाची दिशा सुनील लोणकर यांची कविता देते, असेही डॉ. सदाव्रते यांनी सांगितले.
अध्यक्षीय समारोपात बोलताना मुंबई येथील प्रसिद्ध कवी सतीश सोळांकुरकर म्हणाले की, कवी जरी अबोल असला तरी तो शब्दांतून जे बोलतो ते सर्वव्यापी विषय मांडणारे असते. अनेक कवितांमधून कवीच्या मनातील घुसमट, अस्वस्थता आणि मनाचा शोध घेतला जात असल्याचे कवी सोळांकुरकर यांनी सांगितले.
कार्यक्रमात चित्रकार श्रीधर अंभोरे, प्रकाशक काशिनाथ भारंबे यांनी मनोगते मांडली.
कवी सुनील लोणकर मनोगत मांडताना म्हणाले की, जसे आयुष्य जगत आलो तसे अगदी सहजपणे कविता लिहीत गेलो. मी आत्मसुखासाठी आणि स्वानंदासाठी जे लिहितो तीच कविता असते, असे कवी लोणकर यांनी सांगितले.
कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कवी डॉ. प्रभाकर शेळके यांनी केले. कार्यक्रमास प्रा. बसवराज कोरे, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, डॉ. रावसाहेब ढवळे, पंडित लव्हटे, डॉ. दिगंबर दाते, एम. जी. जोशी, रमेश देहेडकर, कवी कैलास भाले, कवी विनोद जैतमहाल यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.
कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. पंढरीनाथ सारके, सुधाकर वाहुळे, शिवाजी तेलंगे, मनिष पाटील, वैभव लोणकर, प्रशांत लोणकर, तेजस लोणकर, मनोज लोणकर, अशोक लोणकर, विद्युत नगर ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळ, गोतावळा परिवार यांनी प्रयत्न केले.

# सार्थक चालीकवारचे सुयश

आधुनिक केसरी न्यूज

**महागाव :** आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती (एन एम एम एस) या परीक्षेमध्ये महागाव शहरातील मातोश्री माध्यमिक विद्यालयातील सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सार्थक रवींद्र चालीकवार या विद्यार्थ्याने खुल्या प्रवर्गातून तालुक्यातून प्रथम व जिल्ह्यातून सहावा क्रमांक येण्याचा मान पटकावला आहे.त्याने 173 पैकी 128 म्हणजेच 74% गुण प्राप्त केले



आहे. कोणताही शिकवणी वर्ग नसताना शाळेतील शिक्षकांच्या व पालकांच्या मार्गदर्शनामुळे त्याने हे यश संपादन केले आहे. गायत्री नवदुर्गे, अर्जुन नरवाडे, कोमल वाळूकर, श्रावणी फटिंग, अनुराधा राऊत हे विद्यार्थी सुद्धा आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.
या परीक्षेच्या माध्यमातून गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी 12 हजार रुपये याप्रमाणे चार वर्ष (बारावीपर्यंत) एकूण 48 हजार रुपये शैक्षणिक खर्चाकरिता दिले जाते. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मातोश्री विद्यालयाच्या प्राचार्या गावंडे मॅडम, वर्गशिक्षक कदम सर व इतर शिक्षकवृंदांनी केले आहे.

# प्रोफेसर सुहास मोराळे यांची विद्यापीठ सिनेट निवडणूक प्रमुख म्हणून निवड



## शैक्षिक संघाच्या वतीने निवडणूक प्रमुखाचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

**औरंगाबाद :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शैक्षिक संघाच्या विभागीय कार्यकारिणीच्या दि. 24 सप्टेंबर 2022 आभासी बैठकीत चारही जिल्ह्यांच्या वतीने औरंगाबाद, बीड जालना व उस्मानाबाद एकमताने प्रोफेसर सुहास मोराळे माजी विद्यार्थी कल्याण संचालक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्वा. सावरकर महाविद्यालय बीड यांची सर्व जिल्हा अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत व सहमतीने सर्वानुमते प्राधिकरण



सिनेट निवडणूक 2022-2023 साठी निवडणूक प्रमुख म्हणून घोषना करण्यात आली. डॉ. सुहास मोराळे यांना 23 वर्षाचा शैक्षणिक, विद्यापीठात संवैधानिक पदाचा व एन. सी. सी . अधिकारी पदासोबत विद्यापीठातील विविध निवडणुकांचा अनुभव असुन दांडगा जनसंपर्क, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती, मनमिळाऊ, अभ्यासू स्वभाव असल्याने आजपर्यंत प्राध्यापक, प्राचार्य व विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शैक्षिक संघाच्या वतीने निवडणूक प्रमुखाचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अध्यक्ष प्रोफेसर दिलीप अर्जूने महामंत्री प्रोफेसर सत्यप्रेम घुमरे, महिला अध्यक्षा डॉ. महानंदा दळवी, डॉ. भगवान डोके, डॉ.सोपान सुरवसे, डॉ. हेमंत वर्मा, डॉ. शहादेव रसाळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# माध्यम साक्षर होणे गरजेचे : अतुल पेठे

## मनोविकास प्रकाशनातर्फे नीलांबरी जोशी लिखित ‘माध्यम कल्लोळ’ ग्रंथाचे प्रकाशन व मुक्तसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** माध्यमे ही जशी जागृतीची साधने आहेत, तशी ती भीतीची दुकानेही आहेत. माध्यमांमधील हा कल्लोळ पूर्वीपासून आहे. त्यामुळे माध्यमांना दोष देण्याऐवजी त्यातले चांगले-वाईट समजून घ्यायला हवे. त्यासाठी तारतम्य बाळगत, मधली ओळ वाचत आपण माध्यम साक्षर व्हायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्य-दिग्दर्शक अतुल पेठे यांनी केले. मनोविकास प्रकाशनातर्फे नीलांबरी जोशी लिखित ‘माध्यम कल्लोळ’ ग्रंथाचे प्रकाशन व मुक्त संवादात अतुल पेठे बोलत होते. टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पदमजी सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी अभिनेते गिरीश कुलकर्णी, माध्यम अभ्यासक समीरण वाळवेकर, ज्येष्ठ पत्रकार रवि आमले, मनोविकास प्रकाशनाचे अरविंद पाटकर आदी उपस्थित होते. अतुल पेठे म्हणाले, बाह्यजगात आपल्याला उत्पादन आणि ग्राहक म्हणून वापरले जाते. हिंसा आणि लैंगिकता माध्यमाच्या केंद्रस्थानी राहिली आहे. त्यातून अनेकदा मानसिक आरोग्याचे प्रश्न उद्‌भवतात. अशावेळी आपल्यातील विवेक जागृत ठेवायला हवा. बदलत्या तंत्रज्ञानानुसार आपण बदल स्वीकारले पाहिजेत. जीवनशैली बदलली, तरी जीवनमूल्ये बदलता कामा नयेत. तसे झाले तर आपण या कल्लोळातही सहीसलामत राहू शकतो. गिरीश कुलकर्णी म्हणाले, सद्यस्थितीत माध्यमांत माहिती आणि कलकलाट अधिक आहे. आपल्या आकलन, अनुभवाइतकेच आपण बोलावे. ग्राहककेंद्री माध्यमात रोज नवे भोग करून विकले जातात. जगण्याची स्पर्धा, भांडवलाची गरज यामुळे हा कल्लोळ सातत्याने होत राहील, त्यात आपण किती बुडायचे हे प्रत्येकाने ठरवावे. माणूस बनण्याची प्रक्रिया सातत्याने सुरु असते. या कल्लोळापासून जे दूर आहेत, ते आजही खळाळून हसतात. आनंदी जीवन जगतात. समीरण वाळवेकर म्हणाले, माहिती आणि बातमी यात फरक आहे. सध्या ब्रेकिंगच्या जमान्यात खऱ्याचा आभास निर्माण करून ती बातमी पोहोचवली जाते. त्यातून फेक न्यूज प्रतिबिंबित होते. आपण माध्यम साक्षर आहोत हा भ्रम आहे. विकृत प्रयोगातून निर्माण झालेले उत्पादन आपल्यापर्यंत येऊ द्यायचे नसेल, तर आपण माध्यम साक्षर होण्याची गरज आहे. रवि आमले म्हणाले, असत्य, अर्धसत्य हा प्रपोगंडाचा पाया असून, माध्यमे त्याचे वाहक आहेत. परंतु माध्यमांचे व्यवस्थापन चालण्यासाठी जाहिराती गरजेच्या आहेत. अर्थकारण जुळत नसल्याने माध्यमातील अनेक लोक दरिद्री अवस्थेत आहेत. त्यामुळे वाचक, प्रेक्षक म्हणून आपण जागृत राहून त्यातील चांगले ते घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अरविंद पाटकर म्हणाले, वाचनसंस्कृती लोप पावतेय, हा माध्यमातून होणारा अपप्रचार आहे. आपण वाचकांपर्यंत पोहोचण्यात कमी पडतो. ही दुरावस्था थांबवण्यासाठी वाचकांनी जागृतपणे पुस्तके वाचली पाहिजेत. लोकांपर्यंत पुस्तके पोहोचण्यासाठी प्रयत्न व्हावेत. पुस्तकांवरील जीएसटीमध्ये सवलत द्यावी. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी २० जिल्ह्यात ललित साहित्याचे दुकान नाही, याची खंत वाटते. माधुरी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अरविंद पाटकर यांनी स्वागत-प्रास्ताविक केले.




**‘माध्यम कल्लोळ’ उलगडताना...**

“सर्वच प्रकारच्या माध्यमांचा जनमानसावर होणारा परिणाम यात मांडला आहे. मालिका, चित्रपट, प्राईम टाइम, ओटीटी प्लॅटफॉर्म, अटेंशन इकॉनॉमी, सनसनाटी बातम्या, जाहिराती, मोबाईल, इंटरनेट, स्क्रीन ॲडिक्शन, नोमोफोबिया, आत्मकेंद्री, सेल्फी, टेक्नोफेरन्स, सायबर बुलिंग, ट्रोलिंग अशा गोष्टींचा परिणाम समाजावर होतो. लाईक्स, कमेंटला अधिक प्राधान्य दिले जाते. त्यातून सायबर गुन्हेगारी वाढीस लागते. या कल्लोळात आपणही बुडतो आहोत, या गोष्टी लक्षात येत नाहीत. अशा सगळ्या गोष्टींचा उहापोह यात केला आहे.

– नीलांबरी जोशी, लेखिका



# कार्तिक कुऱ्हाडे यास शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, विजय भटकर यांच्या हस्ते पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** रांजणगाव पोळ येथील लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर माध्यमिक विद्यालयाच्या वर्ग आठवीच्या विद्यार्थी कार्तिक किसन कुऱ्हाडे याने पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व व कथाकथन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. त्यामुळे जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते विद्यार्थी कार्तिक व शिक्षक प्रतिनिधी संतोष मल्लनाथ सहशिक्षक रामेश्वर शेळके यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील विविध शाळेतील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत रांजणगाव येथील लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर महाविद्यालयाचे २४ विद्यार्थी सहभागी झाले. यापैकी इयत्ता आठवीचा गुणवंत विद्यार्थी कार्तिक किसन कुऱ्हाडे यास राज्य पातळीवरील तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्कार वितरण प्रसंगी संस्थेचे संचालक प्रदीप लोखंडे, डॉ. विजय भटकर, डॉ. जब्बार पटेल, डॉ. नौशाद फोर्ब्स, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. मुजुमदार, अनु आगा, एअर मार्शल भूषण गोखले, ख्रिस्तोफर बनींजर आदींची उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंदुमतीताई डोणगावकर, सचिव देवयानीताई डोणगावकर, मार्गदर्शक कृष्णा पाटील डोणगावकर, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी बोडखे पाटील, मुख्याध्यापक सुधाकर थोरात यांच्या सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शालेय समितीचे सदस्यांनी अभिनंदन केले.

# सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचा 34 वा वर्धापनदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचा 34 वा वर्धापनदिन धुळ्यातील देवपूरात बहुजन हिताय एज्युकेशन ट्रस्टच्या बार्टी स्पर्धा परीक्षा क्लासेस येथे उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि सत्यशोधक समाजाचे अखंड गायनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मान्यवर अतिथींचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक जनआंदोलनाचे राज्य सचिव कॉम्रेड सिध्दार्थ जगदेव होते. या कार्यक्रमात ‘सत्यशोधक विद्यार्थी संघटनेची भूमिका आणि सद्यस्थितीचे लढे या विषयावर प्रा. डॉ. महेंद्रकुमार वाढे, ‘सध्याची शिक्षणव्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न या विषयावर प्रा. राजीव हाके, सत्यशोधकी संमेलने या विषयावर धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव, विद्रोही कवी प्रा. सचिन बागुल, “सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचे लढे” या विषयावर प्रा. वाल्मीक सुरवाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान जागर कला मंचाच्या पथकाने क्रांतीगीते, जागरगीते सादर केली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सत्यशोधक महिला आघाडीच्या रोहिणी जगदेव, लुंबिनी शिरसाठ, सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचे माजी राज्य सचिव राकेश अहिरे, राज्य संघटक सिध्दांत बागुल, मनोज नगराळे, शरद वेंदे, अमोल शिरसाठ, जितेंद्र अहिरे, संदीप बोरसे, मनीष दामोदर, अतुल बैसाणे, प्रसेनजीत जगदेव, हर्ष मोरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन कवी दीपक बैसाणे यांनी केले. क्रांतीगीते गावून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



# एल.सी.बी.ची मोठी कारवाई : २७ लाखांचा गुटखा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूरकडून धुळे मार्ग औरंगाबाद दिशेने जाणार सुगंधित गुटख्याने भरलेला आयशर ट्रक एल.सी.बी ने सापळा रचून सकाळी पाच वाजेच्या सुमारास हा ट्रक पकडण्यात आला.

सध्या धुळे जिल्ह्यात पोलीस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील व पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या धडाकेबाज कारवाया होत आहेत, अशीच एक कारवाही एलसीबीच्या पथक साह्याने करण्यात आली. परराज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पानमसाल्याची तस्करी होत असल्याने मा.पोलीस अधीक्षक प्रवीणकुमार पाटील, धुळे यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांना सुचना देऊन कारवाई चे आदेश दिलें होते सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असतांना पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थागुशा धुळे यांना गुप्तबातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, आयशर वाहन यामध्ये राजनिवास सुंगधीत पानमसाला प्रवास होत असून सदर आयशर वाहन शिरपूरकडुन धुळे मार्ग औरंगाबाद दिशेने जाणार असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी बाळासाहेब सुर्यवंशी व पथकास नमुद बातमीची खात्री करून योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत आदेशीत केले. सदर पथकाने चाळीसगाव रोड चौफुलीचे पुढील औरंगाबाद रोडवरील हॉटेल 5555 येथे सापळा लावून वर नमुद वाहनांची वाट पाहत असताना पहाटे 05.00 वाजेच्या सुमारास आयशर वाहन क्रमांक MH 48 AG 9847 धुळे कडुन औरंगाबाद दिशेने येत असल्याची दिसल्याने पोलीस पथकाने त्यांना थांबण्याच्या ईशारा करताच त्यांनी लागलीच सदरचे आयशर वाहन रोडाचे कडेला थांबवून पोलीस असल्याची चाहुल लागताच वाहन सोडून चालक व क्लिनर असे अंधाराचा व झाडाझुडपांचा फायदा घेवून पळाल्याने पथकाने त्यांचा पाठलाग केला परंतु ते मिळून आले नाही. सदर वाहनाची तपासणी करणेकामी आयशर वाहन पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आवारात आणुन शासकीय पंचासमक्ष आयशर वाहनाची तपासणी करता त्यात लाखो किमतीचा पानमसाला गुटखा मिळून आला तो , किंमत वर्णन 9,60,000 / - रु . किं . चा प्रिमियम राजनिवास पानमसाला 2,40,000 / - रु.किं . चा प्रिमियम एक्स.एल .01 जाफरानी जर्दा 15,00,000 / - रु.कि.ची. आयशर वाहन क्रमांक MH 48 AG 9847 मुद्देमाल असा एकुण 27,00,000 / - रु. किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत पानमसाला गुटख्याची वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचे विरुध्द अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी किशोर बावीस्कर यांचे फिर्यादीवरुन मोहाडी नगर पोलीस ठाणे येथे अन्न सुरक्षा व मानके कायदा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई प्रवीणकुमार पाटील, पोलीस अधीक्षक, प्रशांत बच्छाव, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था. गु.शा.चे हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक सतिष गोराडे, पोसई बाळासाहेब सुर्यवंशी, रफिक पठाण, श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, संदीप सरग, राहुल सानप, योगेश चव्हाण, कमलेश सूर्यवंशी, राहुल गिरी, गुलाब पाटील अशांनी केली आहे.



# शारदीय नवरात्र महोत्सवास उत्साहात प्रारंभ

## “आई राजा उदो उदो जयघोषाने तुळजापूर नगरी दुमदुमली”

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास तुळजापूर येथे सोमवारी धार्मिक वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे पारंपरिक पध्दतीने तुळजाभवानी देवींची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर दुपारी 12 वाजता श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री कौस्तुभ दिवेगावकर यांच्या हस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. मंत्रोच्चाराने, आई राजा उदो-उदोचा जयघोष आणि संबळाच्या साथीने सर्व वातावरण मंत्रमुग्ध त्यानंतर घट कलशाची पारंपरिक पध्दतीने पुजा करुन गोमुख तिर्थापासून या घट कलशांची मिरवणूक काढण्यात आली. मंदिरातील गाभाऱ्यात तसेच खंडोबा मंदिर, यमाईदेवी मंदिर, टोळभैरव आणि आदिमाया आदिशक्ति या मंदिरामध्ये जिल्हाधिकारी श्री कौस्तुभ दिवेगावकर यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली.

मंदिर व्यवस्थापन आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने होणाऱ्या गरजेचा त्रास टाळण्यासाठी व भाविकांच्या दर्शनाच्या सोयीसाठी मंदिर संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर (www.shrituljabhavani.org) ऑनलाईन दर्शन व्यवस्था करण्यात आली असून भाविकांनी दर्शन सुविधेचा लाभ घरी बसूनच घ्यावा, असे आवाहनही व्यवस्थापन समितीचे करून करण्यात आले आहे.

यावेळी मंदिरातील धार्मिक कार्यक्रमास आमदार राणाजगजितसिंह पाटील ,जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी रुपाली आवले-डंबे, अर्चनाताई पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. योगेश खरमाटे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) योगिता कोल्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक विश्वास कदम, सहायक जनसंपर्क अधिकारी नागेश शितोळे, अक्षय पाटील,एस.के कदम,संजय सोंजे महंत तुकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, पाळीकर पुजारी मंडळ, उपाध्ये मंडळ, भोपे पुजारी मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकरांकडून भाविकांना शारदेय नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा देत कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्याचे आवाहन करण्यात





# वृक्ष लागवड म्हणजे प्रदूषणमुक्त समाजरचनेची चळवळ

## ज्ञानेश्वर मगर : तलवाडा येथील तरुण वाढदिवसाचा खर्च टाळून करताहेत वृक्ष लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वृक्षवल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे वृक्षच मानवाच्या जीवनामध्ये आनंद देऊ शकतात. त्यामुळे तरुणांनी वाढदिवसानिमित्त वृक्षलागवड करण्याचा नवीन उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे वाढदिवसाच्या अनाठायी खर्चाला आळा बसेल व जीवनात आपण काहीतरी समाज उपयोगी कार्य या निमित्ताने करू शकतो म्हणून मी हा वाढदिवस अगदी साध्या पद्धतीने वृक्ष लागवड करत साजरा केला आहे. तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत संगणक ऑपरेटर काकासाहेब मगर यांचा वाढदिवस वृक्ष भेट देऊन करण्यात आला युवकांनी अशाच प्रकारचा वाढदिवस साजरा करावा असा संदेश देण्यात आला. वाढदिवस म्हटले की बॅनर, पोस्टर लावण्याची परंपरा गेल्या काही वर्षात सर्वत्र दिसून येते, मात्र या परंपरेला फाटा देत समाजोपयोगी आणि पर्यावरणाचे संवर्धन व्हावे हा उद्दात हेतू समोर ठेवूनपर्यावरणाचे संतुलन आणि समतोल कायम राखण्यासाठी व वृक्ष संगोपणाची



चळवळ जनमाणसापर्यंत रुजावी या हेतूने वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथील तरुण ग्रामपंचायत सदस्य शांताराम मगर यांचा वाढदिवस वृक्ष लागवड करुण साजरा करण्यात आला होता.तेव्हापासून आजतागायत गावातील तरुणांनी हि चळवळ सुरुच ठेवली आसुन तहसीलदार राहुल गायकवाड यांनीही या उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले होते. यावेळी चेअरमन राजेंद्र मगर सरपंच पती ज्ञानेश्वर मगर शांताराम मगर रहिमखा पठाण वसंत मगर राजेंद्र मगर रवि मगर योगेश मगर सुभाष रोकडे पापा शेख यांच्यासह अनेक तरुणाची उपस्थिती होती. यावेळेस बोलताना शांताराम मगर म्हणाले परंतु दिवसेंदिवस वाढत चाललेल्या व्यावसायिक,राजकीय जाहीरतीबाजीच्या फलकांमुळे सजीव वृक्षांनाच मोकळा श्वास घेणे कठीण झालेले दिसते. त्याकरीता बहूतांश ठिकाणी वृक्षांवर लावलेले फलक शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून त्वरीत हटविण्यात येवून वृक्षांचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे, रस्ता रुंदीकरणाच्या पट्ट्यातील वृक्षतोड हा विकासात्मक भाग असला तरी त्या वृक्षकत्तलीच्या जागी नवीन वृक्ष लागवड करुण त्याच्या संगोपनाची अंमलबजावणी झाली पाहीजेत. कृतीनंतरही उल्लंघन करणारांवर योग्य ती कार्यवाही करावी असे शांताराम मगर म्हणाले. यावेळी बोलताना ज्ञानेश्वर मगर म्हाणाले दिर्घायुष्याकरीता नैसर्गिक आरोग्यवर्धक गुणधर्म अंतर्भुत असलेले वृक्ष मानवाला प्राणवायू फळे, फुले, सावलीच देत नाहीत तर अंतिम क्षणातही त्याला साथ देतात. ही जाणीव अंगी बाळगून त्याने पर्यावरणास घातक ठरणाऱ्या घटकांचे पतन करुन वृक्षांचे रक्षण केले पाहीजे. संपूर्ण तलवाडा गावात तरुण वर्ग ग्रामपंचायतीच्या वि.वि.का. सोसायटीतच्या माध्यमातून वृक्ष लागवड करण्याकरीता सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे. पर्जन्यमानासाठी व संतुलनासाठी उपयुक्त असल्यामुळे ग्रामीण भागाच्या सौदर्यात सुध्दा भर पडेल. नागरीकांनी वृक्षांना आपल्या अपत्याप्रमाणे समजून संगोपन केल्यास शुध्द प्राणवायु मिळेल तसेच आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल, असे ज्ञानेश्वर मगर यांनी सांगितले.



# ठिय्या आंदोलनाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मागील दोन वर्षापासून बंद असलेली जिरि शिवूर एसटी फेरी सुरू करण्यासाठी परिसरातील विदयार्थी पालक सरपंच यांनी पंचायत समितीचे माजी उपसभापती पती आनंद निकम यांच्या नेतृत्वाखालील बस डेपो येथे ठिय्या आंदोलन सुरू केले होते. मागील दोन वर्षापूर्वी ही बस सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र मागील काही दिवसांपासून बस फेरी बंद करण्यात आली होती. बिरोळा, वळण, जीरि, मनुली, बल्हेगाव, पिंपळगाव, बंगला या भागातून असंख्य विद्यार्थी व्यापारी, नोकरदार, शेतकरी, महीला यांना शिवूर आणि वैजापूर येथे ये जा करण्यासाठी वाहनाची व्यवस्था नव्हती. मुली तसेच महीला यांना सायंकाळी घराकडे येताना असुरक्षित वाटत होते. मागील बऱ्याच दिवसापासून अनेकांनी निवेदने दिले. विनंती केली मात्र प्रशासन याची दखल घेत नव्हते. आज आनंद निकम यांच्यासह बाळू भोसले, पंकज ठोंबरे, बाळू शेळके, विनायक गाढे, रवी सताळकर, कैलाश निकम, कारभारी शिंदे, चांगदेव जाधव, अंकुश जाधव, बापू आहेर, सुजित रांधे, आदींनी भेटी दिल्या. शुक्रवार पासुन ही बस फेरी सूरू करण्याचे लेखी आश्वासन पत्र दिल्यानंतर आंदोलनं मागे घेण्यात आले. नरवडे साहेब आणि शेख साहेब यांनी बंदोबस्त साठी काम केले.

# डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वात लाईफजॅकेट भेट आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्हा आपत्तीव्यवस्थान प्राधिकरण अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी बीड यांनी साडे चार महिन्यांपूर्वी आपत्तीव्यवस्थान मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांना बचाव कार्यासाठी आवश्यक वेगवेगळ्या साहित्याची तपशीलवार मागणी केली होती. परंतु पावसाळा संपत आला तरीसुद्धा जिल्ह्याला साहित्य मिळाले नसुन एकंदरीतच जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवल्याचेच दिसून येत असून हलगर्जीपणाच्या निषेधार्थ आज दि.२६ सप्टेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असंवेदनशील धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा कार्याध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाईफजॅकेट भेट आंदोलन करण्यात येऊन निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांना निवेदन तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्यावतीने जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा आपत्तीव्यवस्थान मदत व पुनर्वसन विभाग मंत्री महाराष्ट्र राज्य यांना लाईफजॅकेट भेट देण्यात आले यावेळी आंदोलनात भ्रष्टाचार निर्मूलन समिती बीड जिल्हाध्यक्ष शेख युनुस च-हाटकर सय्यद आबेद बीडकर, राहुल कवठेकर, शेख मुस्ताक बीडकर, शेख मुजीब बीडकर,धनंजय सानप, दिपक बांगर आदी सहभागी होते.



# मनेगाव फाटा ते सहानगावच्या रस्ता कामास सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** कन्नड आणि वैजापूर या दोन तालुक्याच्या हद्दीत येत असलेला मनेगाव फाटा ते सहानगाव या तीन किलोमीटर रस्त्याची गेल्या कित्येक वर्षापासून अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. कन्नड, वैजापुर या दोन्ही तालुक्यातील लोकप्रतिनिधीसाठी अतिशय शुल्लक असलेल्या या तीन किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी कित्येक वर्षांपासून नागरिकांची होती. परंतु नागरिकांच्या यांच मागणीचा विचार कोणतेच लोकप्रतिनिधी करत नसल्याने संतप्त झालेल्या सहानगाव येथील ग्रामस्थांनी आक्रमक भुमिका घेत शनिवारी खारी खामगाव धरणात उड्या मारुन जीवघेणे जलसमाधी आंदोलन केले.

कन्नड - वैजापुर या दोन्ही तालुक्याच्या हद्दीत या रस्त्याचे क्षेत्र येते. आज पर्यंत दोन्ही तालुक्याच्या लोकप्रतिनिधिनी अनेक वेळा या रस्त्यासाठी निधी देऊ अशी आश्वासने दिली खरी मात्र सर्व आश्वासन हवेत विरगळली. सहानगाव ते मनेगाव फाटा हा अडीच किलोमीटर हा रस्ता २००१ ते २०२१ रस्ता विकास योजनेत समाविष्ट नसल्याने आम्हाला हे काम करता येत नाही, व हा रस्ता दुरुस्ती करायची असेल तर जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत रस्ते विकास योजणेत समाविष्ट करण्याचा फुकटचा सल्ला सार्वजनिक बांधकाम विभाग पच्छिम आतापर्यंत देत आले आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने देखील हा रस्ता उपविभाग कन्नड च्या कार्यक्षेत्रात येतो असा लेखी खुलासा जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांच्याकडुन देण्यात आला असताना देखील कन्नड तालुक्याचे लोकप्रतिनिधी याकडे लक्ष नसल्याने सहानगाव येथील नागरिक संतप्त झाल्याने शनिवारी त्यांनी खारी खामगाव धरणात जीवघेणे जलसमाधी आंदोलन केले. एकीकडे विकासाच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे अवघ्या तीन किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्ती साठी नागरिकांना जलसमाधी आंदोलन करायला नागरिकांना भाग पाडायचे यापेक्षा मोठे दुदैव कोणते आहे. या काळ्याभुईतील रस्त्याकडे जाणूनबुजून दूर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.



**हर्षवर्धन जाधव आंदोलनस्थळी जाताच प्रशासन खडबडून झाले जागे :** सहानगाव येथील मनेगाव फाटा ते सहानगाव या तीन किलोमीटर रस्त्यासाठी जीवघेणे जलसमाधी आंदोलन करत होते. तरी मात्र प्रशासनाकडून या जीवघेण्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दुपारपर्यंत पाहायला मिळाले. माजी आमदार हर्षवर्धन जाधव हे आंदोलनस्थळी येताच जिल्हा परिषद बांधकाम, महसुल प्रशासन खडबडून जागे झाले जो पर्यंत मला या रस्त्याबाबदचे समाधानकारक लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत मी येथुन हलत नाही असा पवित्रा माजी हर्षवर्धन जाधव पवित्रा घेल्याने जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता विजय डहाके यांनी जाधव यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला व मग्रारोह योजनेतुन हा रस्ता आपण करू लगेच दोन दिवसात अंदाज पत्र सादर करण्याचे आदेश देता असे सांगितले.

**व डागडुगीच्या कामास सुरवात केले :** नायब तहसीलदार मोनाली सोनवणे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अभियंता बलखंडे तलाठी आबा पाटील, साह्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी नारळ फोडुन कामास सुरवात झाली यावेळी शरद गायके, प्रशांत नलावडे, कमलाकर धाटबळे, उदय गवळी, किशोर धाटबळे, सोनाजी धाटबळे, सोमनाथ धाटबळे, उत्तम धाटबळे, पुंडलिक धाटबळे, दिलीप धाटबळे, शांताराम धाटबळे, ज्ञानेश्वर नलावडे, धिरज डोखळे या आंदोलनकर्त्यासह ग्रामस्थ उपस्थीत होते.

# कॉपर वायर चोरट्याच्या मोहाडी पोलिसांनी आवळल्या मुस्क्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** एमआयडीसीतील गोदामाची भींत फोडून चोरट्यांनी दीड लाखांची तांब्याची तार लंपास केली होती . घटनेनंतर पोलिसांनी चोरट्यांचा यशस्वी माग काढला असून तिघांना जेरबंद केले आहे. अवघ्या आठ दिवसांतच चोरीची उकल करण्याची कामगिरी मोहाडी पोलिसांच्या शोध पथकाने केली. एमआयडीसीतील अवधान याबाबत अधिक वृत्त असे की , अक्षय भीमराव वरवटे यांच्या श्री स्वामी समर्थ रोडवेजच्या गोदामातून १ लाख ५८ हजार रुपये किंमतीची तांब्याची तार चोरट्यांनी चोरली होती . ही घटना १७ सप्टेंबर रोजी घडली चोरीच्या प्रकरणात मोहाडी पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने महेश्वर नगरातील समाधान भगवान मोरे, विनोद राजेंद्र पाटील व नंदू महादू गवळी या तिघांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली. तिघांनी पोलिसांना चोरीची कबूली देऊन चोरलेला मुद्देमाल काढून दिला. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन ही गाडीही जप्त केली आहे. पोलिसांनी एकूण १ लाख ७७ हजारांचा ऐवज हस्तगत केला . ही कामगिरी डीएसपी प्रवीणकुमार पाटील, एएसपी प्रशांत बच्छाव, डीवायएसपी ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहाडीचे एपीआय भूषण कोते, पीएसआय आर. आर. सूर्यवंशी, शोध पथकाचे पोहेकॉ शाम काळे, पोना राहूल पाटील, पोकॉ गणेश भामरे, जितेंद्र वाघ, मुकेश मोरे, राहूल गुंजाळ , समीर पाटील, सचिन वाघ, धिरज गवते यांनी केली असून वरिष्ठांनी पोलिसांचे कौतुक केले आहे.



# सावळदबारा येथील कॅशिअर रत्नाकर हुंबरे यांची राजकीय दबावामुळे बदली

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** सावळदबारा येथील मध्यवर्ती बँकेमध्ये कार्यरत असलेले कॅशियर रत्नाकर आसाराम उंबरे यांची कै राजकीय पोटी राजकीय लोकांचा काम न केल्यामुळे यांच्याकडून थेट वरिष्ठ कार्यालयात संपर्क साधून त्यांच्यावर राजकीय दवाब आणून डायरेक्टरने त्यांची बदली करण्यात आली.हि बदली पुन्हा सावळदबारा शाखेत करण्यात यावी अशी मागणी भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण यांनी केली आहे. अगोदरच इकडे ग्रामीण भाग असल्याने कर्मचारी येत नाही. आला तर आठ,दहा महिन्यात त्यांची बदली करण्यात येते. कर्मचारी तो तर दिवटी कोठे पण करु शकतो परंतु मुलांच्या शिक्षणाचे काय त्यांच्या शिक्षणाचे आथिर्क नुकसान होते. याचा विचार वरिष्ठ कार्यालयाने केला पाहिजेत. काही पुढाऱ्या लोकांच्या काम न केल्यामुळे माझी बदली करण्यात आली आहे परंतु या परिसरात राजकीय लोकांचा जो एकुल चालेल बँकेत त्यांचे काम होणार नाही ऐकल्यास त्यांची बदली करण्यात येते असा मनमानी कारभार या सर्कलमध्ये काम करताना कर्मचाऱ्यांनी अनुभव घेतला आहे. परिसरात कोणताही कर्मचारी काम पोटी दबावाखाली काम करायचं ऐकल्यास वरिष्ठांना फोन जाणार मग मंत्री आमदार खासदार यांच्यामार्फत आमची बदली करण्यात येते सरकारी माणूस कसं काम करायचं हा प्रश्न अधिकारी नसतो पण शेवटी इलाज नसतो शासनाचा हात धोरण असेल आम्हाला मान्य आहे परंतु काही काम खराब केले असतो बदली करा कोणाचे दबावापोटी बदली करू नका असे भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे म्हणणे आहे आणि मध्यवर्ती बँकेचे कँशिअर रत्नाकर उंबरे अशे निवेदन वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यात आले आहे. यांप्रसंगी समितीचे पदाधिकारी जिल्हा सरचिटणीस संदीप मानकर महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष सौ.अंजनाताई राधाबाई झलवार तालुका अध्यक्ष महिला आघाडी सिल्लोड ोयगाव तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत, जिल्हा उपाध्यक्ष शेख फिरोज राजाराम पाटील पालोदकर सिल्लोड तालुका अध्यक्ष शेख,फारुख,जब्बार डी.तडवी व प्रा.जीवन कोलते( सामाजिक कार्यक्रर्ता ),उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान सावतबारा गावातील अनेक नागरिक उपस्थित होते निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

# अफवांवर विश्वास ठेवू नका पोलीस निरीक्षक अमोल मोरे

आधुनिक केसरी न्यूज



**औराळा :** सध्या औरंगाबाद जिल्ह्यात मुले पळवणारी टोळी सक्रिय झाले आहे, अशी खोटी अफवा सोशल मीडियावर पसरवली जात आहे अशा प्रकारच्या अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये तसेच सर्व शाळेतील शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच पालकांना अफवांवर विश्वास न ठेवता नियमित शाळेत हजर राहण्याच्या सूचना द्याव्यात असे आवाहन देवगाव रंगारी पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी केले आहे.

कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या जनतेने तसेच पालकांनी मुले पळवून नेणाऱ्या टोळीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास त्याची तात्काळ माहिती देवगाव रंगारी पोलीस स्टेशनला द्यावी तसेच त्याबाबतची पूर्ण खात्री केल्याशिवाय कोणीही त्याची पोस्ट किंवा प्रचार सोशल मीडियावर करू नये पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांकडून तात्काळ त्या बातमीची दखल घेऊन पुढील कारवाई करण्यात येईल देवगाव रंगारी पोलिसांतर्फे जेहूर औराळा सर्कलमधील सर्व शाळा विद्यालय परिसरात पोलीस पेट्रोलिंग लावण्यात आलेली आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी दिली आहे.

# कृषि सामाजिक समावेशन पंधरवड्यानिमित्त तितूर येथे कृषि विभागातर्फे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील तितूर येथे सेवा पंधरवाडा कार्यक्रम दि. २४/०९/२०२२ शनिवार रोजी सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषि अधिकारी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला , यावेळी कृषि पर्यवेक्षक एच बी देशमुख यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजना, पिक विमा व नुकसान भरपाई, इ पिक पाहणी याविषयी शेतकरी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए.एस.महाजन यांनी शेतकरी गट संघटन व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना याविषयी माहिती शेतकऱ्यांना दिली, कृषी सहाय्यक



मानसिंग राजपूत,कृषि सहाय्यक एल टी साळवे यांनी महाडीबीटी योजना, पि एम कि सा न e kyc, कीड व रोग याविषयी माहिती दिली यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयगाव तालुकाध्यक्षपदी सुनील माकोडे

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** सावळदबारा येथील सुनील माकोंडे यांची अनुसूचित जाती सोयगाव तालुकाध्यक्षपदी सावळदबारा येथील सुनील माकोडे यांची निवड करण्यात आली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश नारनवरे यांनी त्यांच्या कामाचा आढावा घेऊन अनुसूचित जाती काँग्रेसच्या सोयगाव तालुका अध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र दिले. काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भास्कर घायवट पाटील यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा सरचिटणीस कैसर आझाद, शहरध्यक्ष शेख फेरोज, डॉ. जफर सय्यद, शेख आशिफ शेख आयुब, देविदास दाडगे, संजय आर. के,आवेज आझाद, सुनील चोरमले, म.आशपाक म.इशा,शेख रहीम पठाण, विश्वनाथ देशमुख, सुभाष राठोड आदी काँग्रेसचे पक्षाचे मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण रुग्णालय नेर येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** ग्रामीण रुग्णालय नेर येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानाचे उद्घाटन श्रीमती कांताबाई पाईकराव, सरपंच ग्रामपंचायत नेर यांच्या हस्ते पार पडले, यावेळी वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालयाने नेर डॉक्टर . विजय वाकोडे यांनी उपस्थित लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामीण रुग्णालय नेर येथील डॉ. गणेश राठोड, मन बेहल सिंह, वैभव गोसावी , दीपक मोळे, लक्ष्मीनारायण आराख, अमोल काळे, खोकले, अधीपरिचारिका श्रीमती नाटेकर, नावगिरे, आणि इतर कर्मचारी उपस्थित होते .



# अवैध गौण खनिज तस्करांच्या नंग्या नाचाला सत्यजित आव्हाड जबाबदार : तलाठी संघटनेचे निवेदन

## तेरा वर्षीय शाळकरी मुलीचा ट्रॅक्टर खाली येऊन पाणपोही फाटा येथे दुर्दैवी अंत





आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** पाणपोही /बहिरगाव फाटा येथे मुरूम, पोयटा व गौण खनिज उत्खनन करून मुरूम वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉली खाली येऊन श्रद्धा पिंपळे या तेरा वर्षीय शाळकरी मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला. माहामार्गालगत शेतीला सध्या सोन्याचा भाव फळफळल्याने आता शेती खाली गेली व महामार्ग बरती आला ते लेवल करण्यासाठी अवैध गौण खनिज तस्काराची पोळी पिकली यांना खतपाणी आता महसुल विभागाचे अ . का . सत्यजित अव्हाडाच नाव समोर येत आहे. यामुळे जोरदार धक्काच बसला आहे. नविन व्यवसाय सुरू करण्यासाठी पायाभरणी साठी भरती, वीटभट्टी साठी कुठली ही परवानगी न घेता गौण खनिज माफियाचा धुमाकूळ चालू आहे सदरं गौण खनिज वाहतूक करणारे जेसीबीच्या साहाय्याने मुरूम,पोयटा व इतर गौण खनिजचे उत्खनन बेकायदेशीर करतात त्यांना पाठीशी घालण्याचे काम महसुल विभागातील अ. का. सत्यजित अव्हाडाच करत आहे व आव्हाडानी या गौण खनिज प्रकारणात हस्तक्षेप करू नये असे निवेदन महाराष्ट्र राज्य तलाठी संघ कन्नड यांच्या तर्फे तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दि .11/12/2019 मध्ये देण्यात आले मात्र गेल्या तिन वर्षा पासुन जैसे थे कारण ते कन्नडचे भुमिपुत्र असल्याने ओळखीचा वापर करून कार्यक्रम जमवुन आणतात असे ही चर्चा आहे. महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेने पुन्हा सप्टेंबर 2022 ला विविध मागण्याच निवेदन अव्हाड यांना मुळ जागेवर हलवण्यासाठी तहसीलदार संजय वारकड व उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते यांना दिले आहे. या निवेदनावर तलाठी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत त्यात म्हणटले आहे पण त्याला ही केराची टोपली जर शासकीय अधिकारी शासकिय कर्मचारीचे लेखी ऐकत नसेल तर विषय गंभीर आहे हि चर्चा आता चव्हाट्यावर आल्याने एकच हास्य होत आहे.

**निवेदनातील मुद्दा क्रमांक 10 :** दि .11/12/2019 रोजी दिलेल्या निवेदनात नमुद केल्या प्रमाणे जिल्हा अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशा नुसार नियुक्त कर्मचारी अ . का सत्यजित अव्हाड यांना रोजगार हमी विभाग या मुळ जागेवर पाठवण्यात यावे अशी मागणी केली होती सदर मागणी बाबत आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही , सभासदांनी यांच्यावर धमक्या देणे , अवैध गौण खनिज प्रकरणात हस्तक्षेप करणे , ऑनलाईन दुरूस्ती , रिक्वेस्ट नामंजुर करणे , महिला तलाठी यांना रात्री 08 : 00 ते 8 .30 पर्यत थांबवुन ठेवणे, दुरुस्ती व इतर कामानिमित्त तहसील कार्यालयात आलेल्या शेतकरी खातेदार यांना तक्रारी देण्यास प्रवृत्त करणे असे संघटनेच्या बैठकीत ठामपणे सभासदांनी मत मांडुन त्यामुळे भविष्यात तलाठी यांच्या तक्रारी वाढु शकतात . म्हणुनच आव्हाड यांना त्यांच्या मुळ जागेवर तात्काळ पाठवण्यात यावे असे निवेदन दिले मात्र याला तिन वर्षा पासुन केराची टोपली दाखवली आहे . अश्याच बेजबाबदार वागण्यामुळे श्रद्धा पिंपळे या विद्यार्थांनीचा मुरूमणे भरलेल्या ट्रॉलीखली येऊन दुर्दैवी अंत झाला महसूल विभागला काही जनाची नाही तर मनाची लाज वाटायला हवी पैश्यासाठी निष्पाप शाळकरी मुलांचा बळी गेला .

**दुसरी चौकट** : विशेष म्हणजे रॉयल्टी घेण्याची पद्धत अर्जदाराने उत्खनन करण्यासाठी अर्जदाराने तहसील कार्यालयाकडे अर्ज सादर करावा .
* अर्ज सादर केल्यानंतर मंडळ अधिकारी व तलाठी यांनी जायमोक्यावर जाऊन आपला अहवाल तहसील कार्यालयात सादर करावा
* अहवाल बघीतल्या नंतर तहसीलदार अहवाल मंजुर करतात .
* अहवाल मंजुर झाल्या नंतर बँकेत चलन भरून तहसील कार्यालयात सादर करावे
* मग तहसीलदार आदेश देतात
* आदेश मिळाल्या नंतर गौण खनिज उत्खननच्या ठिकानी व टाकण्याच्या ठिकानी नकाशा तयार केला जातो .
* उत्खनन गौण खनिज वाहतुक करणाऱ्या वाहनांना नोंद घेऊन टोकन पावती बुक दिले जाते

असे जाणकाराचे मत आहे .
मात्र कन्नड तहसील कार्यालयाचे अजब कारभार समोर येत आहे आधी काम मग परवानगी
शंभर ब्रासच्या चलना वर हाजारो ब्रास महसुल बुडवितांना दिसुन येत आहे
आता तर महसुल विभागाच्या कर्मचारीचेच भात बरबरटलेले दिसुन येत आहे या सर्व प्रक्रीयात कोन कोन आहे लवकरच समोर येईल .
तालुक्याचेच भुमिपुत्र मलीदा खान्यासाठी आपल्याच तालुक्याच निसर्ग सौदर्य लुटण्याच काम सुरू आहे यात कुन्हा कुन्हाची धागेदोरे आहे हे बघण्यासाठी या वर्षीचे तहसील कार्यालयाचे दिवसाचे व रात्रीचे सी .सी .टीव्ही .व्हीडीओ चेक करावे चित्र स्पष्ट होईल
अवैध गौण खनिज तस्कर व खबरी खुर्चीवर व प्रतिष्ठीत नागरीक मात्र उभे राहतात अतंत्य लाजीरवाणी गोष्ट घडत आहे याचा सर्व उलगडा लवकरच .

# आदर्श गाव सराटेवडगाव, आनंदवाडी जलसमृद्ध गाव म्हणून राष्ट्रीय पातळीवर

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** पंचायत राज भारत सरकार व ग्रामविकास व पंचायत विभाग महाराष्ट्र यांच्या ग्रामपंचायत मध्ये शाश्वत विकास ध्येयाच्या स्थानिकीकरणासाठी राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. स्वच्छ व हरित गाव तसेच जलसमृद्ध गाव या दोन विषयावर ही कार्यशाळा संपन्न झाली. दि.२२ ला कार्यक्रमा ची सुरवात कपिल पाटील केंद्रीय मंत्री तथा पंचायती राज्य राज्यमंत्री, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,सुनील कुमार सेक्रेटरी पंचायत राज भारत सरकार,पद्मश्री पोपटराव पवार, आनंद भंडारी संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष पंचायत राज उपस्थित होते,या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रमाला भारत देशातील २८ राज्यांमधून सर्वअधिकारी,पदाधिकारी व सरपंच,ग्रामसेवक उपस्थित होते त्यामध्ये आपल्या महाराष्ट्र राज्यातील १३०० तर बाहेरील राज्यातील २५८ लोक उपस्थित होते महाराष्ट्र मधील अपर सचिव,केंद्रीय मंत्री,राज्य मंत्री,३४ जिल्ह्यातील, उपजिल्हाधिकारी,कृषी अधिकारी,पंचायत समिती अधिकारी,तसेच सरपंच व ग्रामसेवक यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये आपल्या बीड जिल्ह्यामधील दहा सरपंचांना आमंत्रित करण्यात आले होते. दोन दिवसातील ०५ चर्चासत्र झाले. बाहेरील राज्यातील ५ ते ६ गावांनी केलेल्या कामांची चित्रफित दाखवण्यात आली तर आपल्या महाराष्ट्र राज्यातील स्वच्छ गाव व जलसमृद्ध झालेली १० गावांची चित्रफित दाखवण्यात आली,अशा गावांमधून बीड जिल्ह्यातील आदर्श गाव आनंदवाडी सराटे वडगाव गावाला आपल्या गावाची झालेली कामांची चित्रफित हे पूर्ण भारत देशात दाखवण्याचा मान मिळाला. चित्रफित पाहिल्यानंतर सर्वांनी आदर्श सरपंच राम बोडखे सर व आनंदवाडी सराटेवडगाव ग्रामस्थांचे मन भरून कौतुक केले,तसेच चर्चा सत्रा मध्ये सरपंच प्राध्यापक राम बोडखे सर यांच्याशी गाव जलसमृद्ध करण्याचे गमक विचारले त्यावेळी आदर्श सरपंच राम बोडखे यांनी सांगितले.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## सेक्स आणि आहार

आधुनिक केसरी

**सिरॅनो चिल्लिज (ढोबळी मिरची) :** कॅपसिसीनमुळे टेस्टोस्टेरॉन वाटते. सरनो पिपर व क्युअर सेटीन शरीरातील टेस्टोस्टेरॉन वाढवते. यामुळे नाडीची गती वाढते जे उत्तेजनेचे लक्षण आहे.

**पम्पकिन सीड्स (भोपळा) :** यामध्ये झिंक आणि मॅग्नेशियम असते. तसेच पॉली, अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसीड असते जे प्रोस्टाग्लैंडीनसारखे संप्रेरक तयार करतात. ज्यामुळे सेक्स वाढतो.

**चिकन ब्रेस्ट :** यामध्ये अरजीनीन आणि व्हिटॅमीन बी असते.

**सिलेरी (CELERY) :** यामध्ये अण्ड्रोस्टेरॉन हे मेल सेक्स हार्मोन असते, जे घामातून बाहेर पडते व स्त्रियांमध्ये उत्तेजना देते.

**लिव्हर (कलेजी) :** यामध्ये झिंक टेस्टेस्टेरोनला इस्ट्रोजेन मध्ये बदलू देत नाही. बीफ लिव्हरमध्ये व्हिटॅमीन बी १२ असते जे कमी असल्यास 'इरेक्टाइल डिसफंक्शन' होते.

**EGGS (अंडी) :** या मध्ये ' कोलीन' असते. हे फॅट बर्न करते. यामुळे नायट्रिक ऑक्साईड तयार होते. ACH ॲसिटील कोलीन यामुळे जास्त उत्तेजना येते. यामध्ये व्हिटॅमीन बी५ आणि व्हिटॅमीन बी६ असतात, यामुळे संप्रेरक संतुलन आणि स्ट्रेस कमी होतो.

**हनी (मध) :** यामध्ये 'क्युयरसेटीन' असते. ज्यामुळे कठोरता येते आणि स्ट्रेस कमी होतो. यामुळे ब्लड, शुगर यावर परिणाम होत नाही आणि त्यामुळे फॅट्स कमी होतात. यामुळे दुपारचा चहा किंवा ओटमीलमध्ये मधाचा वापर करावा.

**शिताके मशरुम (SHIITAKE MUSHROOMS) :** यामुळे भावना वाढण्यास मदत होते. यात सर्वाच जास्त कोलीनचं प्रमाण असतं. यामध्ये झिंक, व्हिटॅमीन डी असते जे टेस्टोस्टेरॉन वाढवते.

**ग्रास फीड बीफ :** यामुळे शरीर पीळदार बनते. फेंट्स कमी होतात. यामध्ये
व्हिटॅमीन बी १२ असते, जे 'इरेक्टाइल डिसफंक्शन' मध्ये कमी येते.

**मुईरा पुआमा (MUIRAPUAMA) :** हे एक ब्राझिलियन श्रब (झुर) आहे. उत्तेजनक भावना वाढविण्यासाठी हे मदत करते.

**(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# सेवानिवृत्तीच्या पर्वावर असतानासुद्धा पीएच. डी. साठी केले नामांकन

आधुनिक केसरी न्यूज



**खामगाव :** पंचायत समिती खामगाव येथील शिक्षण विस्तार अधिकारी वनश्री ऊर्मिलाताई श्रीकृष्णराव ठाकरे ह्या नुकत्याच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक येथून एम.ए (शिक्षणशास्त्र) समकक्ष एम.एडया परीक्षेत प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाल्या असून ८६% गुण मिळाले आहे. य.च.मु. विद्यापीठ नाशिक यांनी नुकताच त्यांचा निकाल जाहीर केला आहे. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेशानुसार शिका, संघटित व्हा, संघर्ष करा "शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे,जो ते घेईल तो घुरघुरल्या शिवाय राहणार नाही. चुल-मुलं, नोकरी, भाकरी सांभाळून अभ्यास केला व त्या प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत त्यामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in